cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३५३ | शुक्रवार दि.०५ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | ▪ पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वाढते अनारोग्य हा सामाजिक चिंतेचा विषय

परदेशस्थ एका फिटनेस प्रशिक्षकाला तिच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी हृदयविकाराचा झटका आला आणि ती हादरली. त्यातून सावरताच तिने ब्रिटिश हार्ट फाउंडेशनबरोबर या विषयावर जागरूकता निर्माण करण्यासाठी काम सुरू केले. आयुष्याला गृहीत धरू नका, असे आवाहन तिने युवापिढीला केले. याच आशयाचा सल्ला काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदे यांनी दिला होता.

### सर्वोच्च न्यायालयाची राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना समज

नवी दिल्ली : शरद पवार गट आणि अजित पवार गट अशा दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध अंतरीम अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल केले होते. त्यावर बुधवारी दोन्ही गटांनी आपापली मते न्यायालयासमोर मांडली होती. त्यानंतर गुरूवारी अजित पवार गटाने न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करावे तसेच शरद पवार गटाने घड्याळ चिन्ह वापरु नये, अशा स्पष्ट सूचना देत न्यायालयाने दोन्ही गटांना समज दिली आहे. तसेच आता इथे भांडण्यापेक्षा जनतेसमोर जा आणि निवडणुकीत एकमेकांसमोर उभे व्हा, असे मौखिक निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

# दूध उत्पादक शेतकऱ्यांना ९१ कोटी अनुदान वितरित

## उर्वरित १६५ कोटी लवकरच

पुणे । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील दूध उत्पादक शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. अशातच आता दूध अनुदानाबाबत महत्वपूर्ण माहिती समोर आली आहे. दूध अनुदान वितरणाबाबतचे काम प्रगतीपथावर असून, काही अनुदान हे शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहे. तर उर्वरित दूध अनुदानाचा निधी लवकरच वितरित केला जाईल. अशी माहिती राज्याच्या पशुसंवर्धन आणि दुग्धविकास आयुक्तालयाकडून जारी करण्यात आली आहे.



राज्यात शेतकऱ्यांना गायीच्या दुधाला योग्य दर मिळत नसल्याने, डिसेंबर महिन्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांनी राज्यभर आंदोलन उभारले होते. त्यानंतर जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना गायीच्या दुधाला प्रति लिटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शेतकऱ्यांना ११ जानेवारी २०२४ ते १० मार्च २०२४ या कालावधीसाठी दूध अनुदान दिले जाणार आहे. यामध्ये २ महिन्याच्या कालावधीमध्ये राज्यातील ६ लाख ३०३ शेतकऱ्यांना दूध अनुदानापोटी पहिल्या टप्प्यात ९० कोटी ९० लाख ८५ हजार रुपये इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे. त्यानंतर आता लवकरच या शेतकऱ्यांना दुसऱ्या टप्प्यातील १६५ कोटी रुपये इतकी रक्कम वितरित केली जाणार आहे. असे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास आयुक्तालयाने म्हटले आहे. त्यामुळे आता दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### विभागानुसार अनुदान

पशुसंवर्धन आणि दुग्धविकास आयुक्तालयाच्या आकडेवारीनुसार, पुणे विभागातील शेतकऱ्यांना सर्वाधिक ९५ कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे. त्यांनतर नाशिक विभागाला ६२ कोटी रुपये, औरंगाबाद विभागाला ८ कोटी रुपये, नागपूर जिल्ह्याला ४७ लाख रुपये, अमरावती विभागाला १ लाख ३० हजार रुपये, कोकण विभागाला ७ हजार रुपये अनुदान मिळणार आहे. यामध्ये पुणे आणि नाशिक विभाग दूध अनुदान मिळवण्यात आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे.

# अखेर बीडमधून बजरंग सोनवणे यांनाच उमेदवारी

## ज्योती मेटे यांना डावलले, शरद पवार गटाची दुसरी यादी जाहीर

मुंबई । प्रतिनिधी

**आगामी लोकभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाकडून लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये दोन उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये बीडमधून अखेर बजरंग सोनवणे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. ज्योती मेटे या सुद्धा यासाठी इच्छुक होत्या.**

बीड लोकसभा मतदारसंघातून शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी ज्योती मेटे आणि बजरंग सोनवणे हे दोघेजण इच्छूक होते. मात्र, बजरंग सोनवणे यांनी गेल्या निवडणुकीत प्रितम मुंडे यांना चांगली टक्कर दिली होती. ज्योती मेटे यांच्यापेक्षा



बजरंग सोनवणे यांच्याकडे निवडणूक लढवण्यासाठी असलेली यंत्रणा आणि क्षमता हे निकष लक्षात घेता शरद पवार गटाने बजरंग सोनवणे यांना बीडमधून उमेदवारी देऊ केली आहे. बीडमध्ये आता पंकजा मुंडे विरुद्ध बजरंग सोनवणे अशी लढत रंगेल.

भिवंडीतून सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. दुसऱ्या यादीत दोनच नावे आहेत. याआधी पहिल्या उमेदवार यादीत शरद पवार गटाने ५ उमेदवार जाहीर केले होते. भिवंडी लोकसभा मतदारसंघ काँग्रेस आणि शरद पवार गटापैकी कोणाच्या वाट्याला येणार, यावरुन वाद सुरु होता. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये भिवंडीतून काँग्रेसच्या उमेदवाराला लक्षणीय मते पडली होती. त्यामुळे काँग्रेस पक्ष भिवंडी मतदारसंघावरील दावा सोडायला तयार नव्हता. मात्र, या निवडणुकीत शरद पवार गटाकडे सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांच्यासारखा तगडा उमेदवार असल्यामुळे ही जागा आपल्यालाच मिळावी, असा शरद पवार गटाचा आग्रह होता. भाजपचे विद्यमान खासदार कपिल पाटील यांना कडवी टक्कर देण्यासाठी बाळ्यामामा योग्य उमेदवार असल्याची अनेकांची भावना आहे. त्यामुळेच शरद पवार गटाने सुरेश म्हात्रे यांना रिंगणात उतरवले आहे. त्यामुळे आता कपिल पाटील आणि बाळ्यामामा यांच्यातील लढाईत कोण बाजी मारणार, हे आता पाहावे लागेल.

◀◀ पान २ वर

### ज्योतीताई मेटे अपक्ष लढणार ?

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून शिवसंग्रामच्या ज्योतीताई मेटे या इच्छूक होत्या. त्यांनी शरद पवार यांची दोनवेळी भेट घेतली होती. मात्र त्यांना उमेदवारी मिळाली नाही. ज्योतीताई मेटे यांनी नोकरीचा राजिनामा दिला असून, त्या आता सक्रिय राजकारणात आल्या आहेत. शरद पवार यांच्याकडून तिकिट मिळाले नाही तरी त्या अपक्ष म्हणून बीड लोकसभा लढविण्याची शक्यता आहे.

# वंचितकडून परभणीत पंजाबराव डख उमेदवार

परभणी । पतिनिधी



**यापूर्वी वंचितने परभणीतून बाबासाहेब उगले यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, आता त्यांच्याजागी हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पंजाबराव डख यांनी गुरुवारी परभणीतून वंचितचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज भरला. परभणीत महाविकास आघाडीकडून संजय उर्फ बंडू जाधव आणि महायुतीकडून महादेव जानकर हे रिंगणात आहेत. आता पंजाबराव डख या निवडणुकीत त्यांच्यासमोर कितपत आव्हान निर्माण करु शकणार, हे पाहावे लागेल.**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात सध्या वेगवान राजकीय घडामोडी घडताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी राजकीय पक्ष जाहीर केलेले उमेदवार मागे घेऊन नव्या चेहऱ्यांची घोषणा करत आहेत. यामध्ये प्रकाश आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडी पक्ष आघाडीवर आहे. कारण, गेल्या काही दिवसांमध्ये वंचितकडून घोषणा करण्यात आलेला तिसरा उमेदवार बदलण्यात आला आहे. वंचितने गुरुवारी परभणी लोकसभा मतदारसंघातील आपला उमेदवार बदलत नवा ट्विस्ट आणला. वंचित बहुजन आघाडीकडून

◀◀ पान २ वर

## आनंदराज आंबेडकरांनी वंचितला सुनावले

मुंबईः अमरावती लोकसभा मतदारसंघात रिपब्लिकन सेनेचे सर्वेसर्वा आनंदराज आंबेडकर यांना वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा देऊ केला होता. मात्र, हा पाठिंबा म्हणजे निव्वळ दिखाऊगिरी असल्याचा आरोप करत आनंदराज आंबेडकर यांनी वंचित आघाडीला रोखठोक भाषेत खडे बोल सुनावले. तसेच वंचितचा पाठिंबा नाकारत अमरावती लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेत असल्याचे जाहीर केले. आनंदराज आंबेडकर यांनी एका जाहीर पत्राच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

# शनिवारपासून राज्यात तीन दिवस पाऊस

## ● हवामान विभागाचा अंदाज

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील अनेक भागात पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. शनिवार ते सोमवार पावसाचे प्रमाण जास्त राहील. सोमवारी विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना येलो अलर्टही देण्यात आला.**

हवामान विभागाने शुक्रवारी नंदूरबार आणि धुळे जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या सरी पडतील, असा अंदाज दिला. तर शनिवारी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर आणि नांदेड तर खानदेशातली जळगाव, नंदूरबार आणि धुळे तसेच मध्य महाराष्ट्रातील नाशिक, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये



हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला.

रविवारी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, धाराशिव, लातूर आणि नांदेड तर खानदेशातील जळगाव, नंदूरबार आणि धुळे तसेच मध्य महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सोलापूर, सातारा आणि सांगली. तसेच विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. सोमवारी पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज असून संपूर्ण विदर्भ, मराठवाड्यात विजा आणि मेघगर्जनेसह हलक्या पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला.

◀◀ पान २ वर

# वडवणीत ६१ लाखाच्या जमीनीची परस्पर विक्री

## नगरच्या जिल्हा उपनिबंधकासह इतरांवर गुन्हे दाखल

वडवणी । पतिनिधी

**येथील एका संस्थेची जमीन अधिकारात नसताना परस्पर विक्री करण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करून एकूण ६१ लाख ५२ हजार रुपये रकमेचा अपहार करुन संगणमताने फसवणुक केल्य प्रकरणी अहमदनगर येथील जिल्हा उपनिंबधक अमोल विठ्ठलराव माने यांच्यासह लेखापरीक्षक डी.बी. गोरे यांच्यासह दोन व्यक्ती व संस्थेच्या संचालक मंडळावर रात्री वडवणी पोलीसांत फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

वडवणी येथील सहाय्यक निंबधक सहकारी संस्था या कार्यालयातील अधिकारी शिवराज दिलीप नेहकर यांनी याबाबत तक्रार दिली आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, लक्ष्मी यंत्रमान औद्योगिक सहकारी संस्था मर्या. वडवणी ता. वडवणी जि.बीड या अवसायनातील संस्थेची जमीन बेकायदेशिरपणे विक्री करून यातील अरोपीतांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करून अवसायनातील संस्थेची जमीन अधिकारात नसताना परस्पर विक्री

◀◀ पान २ वर

# सोनिया गांधी यांच्यासह १४ राज्यसभा सदस्यांचा शपथविधी

नवी दिल्ली। वृतसंस्था

**माजी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह राज्यसभेतील १४ सदस्यांना उपराष्ट्रपती व सभापती जगदीप धनखड यांनी गुरूवारी (दि. ४) पद व गोपनीयतेची शपथ दिली. सोनिया गांधी यांनी शपथ घेताच त्या गांधी घराण्याच्या इतिहासात राज्यसभेवर जाणाऱ्या पहिल्या सदस्य ठरल्या आहेत.**



आपल्या २५ वर्षांच्या राजकीय आयुष्यात सोनिया गांधी यांनी संसदेत पोहचण्यासाठी वरिष्ठ सभागृहाचा आधार घेतला नाही. त्या १९९९ मध्ये पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आल्या होत्या. कर्नाटकच्या बेल्लारी आणि उत्तरप्रदेशातील रायबरेली या दोन मतदारसंघातून त्या विजयी झाल्या होत्या. बेल्लारीमध्ये सोनिया गांधी यांनी भाजपच्या नेत्या सुषमा स्वराज यांना पराभूत केले होते. आता त्यांनी राजस्थानमधून राज्यसभेचा मार्ग निवडला आहे. सोनिया गांधी यांनी हिंदीतून तर ओडिशातून

◀◀ पान २ वर

## भाजपने शिंदे, पवारांना ताटाखालचे मांजर बनविले-अंबादास दानवे

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ताटाखालचे मांजर बनविले आहे. दोघांनाही भाजपच्या लेखी कवडीची किंमत ठेवलेली नाही. भाजप म्हणेल, तेच त्यांना करावे लागत आहे, अशा शब्दांत शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले.

दानवे यांनी गुरुवारी (दि.४) छत्रपती संभाजीनगरात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यात लोकसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला त्यांचे काही उमेदवार बदलावे लागले. त्याबाबत विचारले असता दानवे म्हणाले, एकनाथ शिंदे असोत किंवा अजित पवार असो या दोघांची अवस्था सध्या वाईट झाली आहे. त्यांना भाजप म्हणेल तेच करावे लागत आहे.

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.५० क्विंटल | २,३०० | ३,१११ | २,५८७ |
| ज्वारी/हायब्रिड :११०.५० क्विंटल | १,९३४ | ३,४३१ | २,८०१ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ३८.५० क्विंटल | ८,८०१ | १०,३३० | ९,९२६ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ९.०० क्विंटल | २,६०० | २,७०० | २,६५० |
| चिंचोका/लोकल: ११.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: १२०.५० क्विंटल | ४,५५० | ४,६०० | ४,५७५ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०१ | ५,४०१ | ५,४०१ |

# केजरीवाल यांना मुख्यमंत्री पदावरून हटविण्याची मागणी करणारी याचीका फेटाळली

नवी दिल्ली । वृतसंस्था

**मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची याचिका उच्च न्यायालयाने गुरूवारी फेटाळली आहे. अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची मागणी करणारी दुसरी जनहित याचिका स्वीकारण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.**

केजरीवाल यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याचे निर्देश देणारी जनहित याचिका (पीआयएल) स्वीकारण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला. अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या



मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याचे निर्देश देणारी जनहित याचिका हिंदू सेना नावाच्या संघटनेचे अध्यक्ष असलेल्या विष्णू गुप्ता यांनी दाखल केली होती. गुप्ता यांनी दिल्ली अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लाँडिंग प्रकरणात अटकेचे

◀◀ पान २ वर

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
2 वर्धापन दिन
महोदय / महोदया
सस्नेह नमस्कार...
शेतकरी हा केंद्रबिंदु मानून दैनिक लोकतंत्र गेल्या २ वर्षापासून जनसेवेत कार्यरत आहे. उद्याच्या गुढीपाडव्याला दैनिक राज्य लोकतंत्रचा दुसरा वर्धापनदिन आहे. वर्धापन दिनानिमित्त आदर्श शेतकरी आणि आदर्श सरपंच पुरस्कार वितरण सोहळ्याचे यंदा द्वितीय वर्ष आहे. पुरस्कार वितरण सोहळा व सोबतीला पश्चिम महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या सातारा साज या संगीत रजनीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी आपण पाडव्याच्या पुर्व संध्येला पुरस्कार वितरण सोहळा व पाडव्यादिवशी चहापान कार्यक्रमास उपस्थित राहून उपकृत करावे ही नम्र विनंती. धन्यवाद!
आदर्श शेतकरी
आदर्श सरपंच
पुरस्कार वितरण सोहळा
---: यांच्या शुभहस्ते :---
डॉ.ओमप्रकाशजी स. शेटे
प्रमुख : आयुष्यमान भारत–मिशन महाराष्ट्र समिती, महाराष्ट्र शासन
---: प्रमुख उपस्थिती :---
मा.नंदकुमार ठाकूर – पोलीस अधिक्षक,बीड
मा.गौतमभाऊ खटोड – सामाजिक कार्यकर्ते, बीड
मा.दत्तामामा बारगजे – संचालक–इन्फंट इंडिया
मा.गोवर्धन दराडे – संचालक–पसायदान सेवा
मुख्य आकर्षण
पश्चिम महाराष्ट्रात लोकप्रिय असलेला सातारा साज संगीत रजनी कार्यक्रम
दिनांक : दि. ८ एप्रिल २०२४ वेळ सायंकाळी ६ वा.
कार्यक्रम स्थळ :- यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कॅनॉल रोड, बीड
वर्धापन दिनानिमित्त चहापानचा कार्यक्रम
स्थळ : यशराज इन हॉटेल, जालना रोड, बीड
* गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मंगळवार, दि. ९ एप्रिल २०२४ * वेळ सायं.५ ते ११ वाजेपर्यंत
---: आपले विनीत :---
सौ. सीमा भीमराव मस्के ( मोकाशे) – संपादक, दै.राज्य लोकतंत्र
गणेश मोकाशे – निवासी संपादक, दै.राज्य लोकतंत्र
अशोक खाडे – कार्यकारी संपादक, दै. राज्य लोकतंत्र
मुख्य कार्यालय : दै.लोकतंत्र, जाधव बिल्डिंग, दुसरा मजला, राजीव गांधी चौक, बीड Mo.9767532635

cmyk

अग्रलेख

# वाढते अनारोग्य हा सामाजिक चिंतेचा विषय

परदेशस्थ एका फिटनेस प्रशिक्षकाला तिच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी हृदयविकाराचा झटका आला आणि ती हादरली. त्यातून सावरताच तिने ब्रिटिश हार्ट फाउंडेशनबरोबर या विषयावर जागरूकता निर्माण करण्यासाठी काम सुरू केले. आयुष्याला गृहीत धरू नका, असे आवाहन तिने युवापिढीला केले. याच आशयाचा सल्ला काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदे यांनी दिला होता. सुदृढ शरीर आणि आरोग्याची गरज वेळीच ओळखा असे बॉलिवूड अभिनेता सुनील शेट्टी यांनी देखील सुचवले होते. त्यांना अनारोग्याच्या फटका बसू शकेल असे कधीही वाटले नव्हते अशी कबुली त्या फिटनेस प्रशिक्षक आणि तळपदे यांनी दिली. ती कबुली मनमोकळी तर आहेच पण इतरांचे डोळे उघडू शकेल अशी आहे.

युवा पिढीतील वाढते अनारोग्य हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. बहुसंख्य युवांची दिनचर्या त्यांना झपाट्याने अनारोग्याकडे नेऊ शकेल अशी आढळते. आहार आणि विहार यांचे वेळापत्रक नसते. फास्ट फूड सेवन कमालीचे वाढले आहे. व्यायामाचा अभाव आहे. वाट्टेल त्या वेळी वाट्टेल ती गोष्ट करण्याची अहितकारक वृत्ती वाढत आहे. त्याच्या मुळाशी आम्ही अजून तरुण आहोत, आम्हाला काय होणार आहे. पाहू पुढचे पुढे अशीच मानसिकता आढळते. तथापि युवांनी देखील त्यांच्या आयुष्याला आणि आरोग्याला गृहीत धरू नये असेच निष्कर्ष अनेक सर्वेक्षणे नोंदवतात. कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयविकार यांचा संसर्ग तरुण पिढीला ग्रासत आहे. प्रतिकारक्षमता कमी होत असल्याने छोटे छोटे आजार सारखे होतात. अनेक व्याधी दीर्घकालीन आहेत. त्या शारीरिक, मानसिक आणि आर्थिक स्तरावर त्या व्यक्तीला उद्ध्वस्त करू शकतात. तात्पर्य, एकूणच आयुष्याकडे आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. चाळीशीत आरोग्य नीट हवे असेल तर त्याची सुरुवात तिशीच्याही आधी करावी लागते असा सल्ला कुटुंबाचे डॉक्टर द्यायचे. त्यामागचे मर्म तेच आहे. दिनचर्येत थोडा जरी बदल कोणी सुचवला की लागलीच वेळ नाही ही सबब त्यांच्या तोंडावर फेकून मारली की, समोरची व्यक्ती गप्प बसते असेच बहुसंख्य युवांना वाटते. पण ते चुकीचे आहे हेच उपरोक्त घटना सुचवतात. अमिताभ बच्चन जेव्हा मुंबईत असतात तेव्हा त्या दिवसात ते सकाळी किंवा संध्याकाळी जिममध्ये हजर असतात असे त्यांच्या प्रशिक्षकाने माध्यमांना सांगितले होते. बचन, तळपदे, शेट्टी, अक्षयकुमार यांना तरुण पिढी त्यांचे हिरो मानते. त्या सर्वांची जीवनशैली कमालीची व्यस्त आहे. पण त्यातूनही ते आरोग्य राखण्यासाठी वेळ काढू शकतात. पण त्यांच्या तुलनेत फारसे व्यस्त नसलेल्या युवांना तो वेळ का मिळू नये किंवा काढता येऊ नये? चांगले आरोग्य प्राप्तीसाठी फक्त व्यायाम पुरेसा नाही. जीवनशैली देखील तशीच असणे अपेक्षित असते. वेळेवर आणि पुरेशी झोप, व्यायाम, हिरव्या पालेभाज्या फळे युक्त व तेल-तुपाचा योग्य वापर असलेला आहार, फास्टफूडला आणि व्यसनांना ठाम नकार असे अनेक बदल तज्ज्ञांना अपेक्षित असतात. ते केले तर आरोग्याची बहुपयोगी किल्ली सापडू शकते. कारण जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची ताकद आरोग्यात असते. चांगले आरोग्य सकारात्मकता, आनंद आणि समाधान बरोबर आणते. त्यामुळे माणसे छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधतात. कधीतरी निवांतपणा अनुभवतात. परिणामी निराशा, घाई, अस्वस्थता, संताप वा क्रोध, अगतिकता, ताण, चंचलता त्यांच्या वाट्याला क्वचितच येऊ शकते. आली तरी तिच्याशी सामना करण्याचे मार्ग त्यांना गवसतात. अशा जीवनशैलीचा स्वीकार उपरोक्त व्यक्तींना जमू शकतो तर सामान्य माणसांना का नाही? त्याचीच जाणीव करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

## बारामतीत लेकीसाठी बीड मध्ये ज्योतीताई मेटे यांचे तिकीट नाकारलं-राजेंद्र आमटे

### पवारांनी पुन्हा बीड जनतेचा विश्वास घात केला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा लोकसभा निवडणुकीत स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांनी लोकसभा निवडणूक लढवावी अशी लोकभावना बीड जिल्हा मधील गोर गरीब सर्व सामान्य माणसाला वाटत होते, या साठी बीड मधील सर्व सामान्य माणूस ज्योतीताई यांना सांगत होता ''ताई तू लढल पाहिजे, मेटे साहेबांचा वारसा जपण्यासाठी ताई तू लढल पाहिजे'' हि लोक भावना जपत ज्योतीताई मेटे यांनी आपल्या शासकीय नोकरीचा राजीनामा दिला लोक भावनेचा आदर करत शरद पवार साहेबांची भेट द्या तुतारीच तिकिट घ्या मेटे ताई यांनी पवार साहेबांची भेट घेऊन तिकीट मागणी केली पण पवार साहेब हे ज्योतीताई मेटे यांची भीती दाखवत बारामती लोकसभेतील वंजारी समाज - बंजारा समाजाची व पंकजा मुंडे यांचे मानलेले बंधू महादेव जानकर



यांच्या धनगर समाजाची मदतीच्या बदल्यात बीड लोकसभा निवडणुकीत स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांनी तिकीट नाकारून स्वतःच्या बारामती मध्ये लेक सुप्रिया सुळे साठी मदतीच्या बदल्यात बीड लोकसभा निवडणुकीत डमी उमेदवार दिला आहे हे अतिशय गलिच्छ दुर्दैवी राजकारनचा जाहीर निषेध करण्यात राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# पहिले मुख्य निवडणूक आयुक्त सुकुमार सेन

**देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या निमित्त अनेक गोष्टी प्रथमच घडत होत्या. देशांमध्ये विविध प्रांतात असणाऱ्या वेगवेगळ्या भाषा आणि त्यात साक्षरतेचे प्रमाण कमी अशा सर्व पात्र ठरणाऱ्या मतदारांपर्यंत पोहोचणे, त्यांचे नावे मतदार यादीत सामील करून घेणे यासह मतदान प्रक्रिया समजावून सांगणे आणि योग्यरीत्या मतदान करून घेणे आधी आव्हाने समोर होती.**

या सर्व मतदान व मतमोजणीची प्रक्रिया प्रत्यक्षात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील प्रशिक्षण देणे आवश्यक होते. या सर्व कामाचा आवाका प्रचंड असा होता. असा आवाका हाताळता येईल या दृष्टिकोनातून आयोगाची रचना आणि निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांची नेमणूक करायची होती.

या कामासाठी त्यावेळी सरकारने भारतीय नागरी सेवेतील तत्कालीन सर्वोच्च अधिकारी असलेले पश्चिम बंगालचे मुख्य सचिव सुकुमार सेन यांची नियुक्ती केली. २ जानेवारी १८९९ ला जन्मलेले सेन हे कोलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजचे विद्यार्थी



त्यानंतर त्यांनी लंडन विद्यापीठात शिक्षण घेतले व ते गणितातील सुवर्णपदकाचे मानकरी होते. भारतीय नागरी सेवेत ते १९२१ मध्ये दाखल झाले १९४७ साली त्यांची तत्कालीन ब्रिटिश सेवेतील सर्वोच्च पदावर अर्थात बंगालचे मुख्य सचिव या पदावर नियुक्ती झाली होती. भारत सरकारने त्यांना निवडणुकीसाठी देशाचे पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून १९५० साली निवडले.

सेन यांच्यासमोर जे आव्हान होते ते खूप मोठे होते. देशात असलेल्या २१ वर्षे वयाच्या १७ कोटींहून अधिक मतदारांची नोंदणी करण्यापासून त्यांना सहजरित्या कळेल अशी सुलभ व्यवस्था निर्माण करायचे ते आवाहन होते. ज्यांना अक्षर ओळख नाही अशा मतदारांना लक्षात ठेवून पक्षनिहाय निवडणूक चिन्हे तयार करून घेणे त्याचे वाटप राजकीय पक्षांना करणे व त्याची संपूर्ण माहिती प्रत्येक मतदारापर्यंत पोहचेल याची खात्री करून प्रक्रिया सुरू करणे ही केवळ सुरुवात होती.

सेन यांना सहाय्यक म्हणून आयोगात दोन आयुक्त आणि प्रत्येक राज्यातून एक मुख्य निवडणूक अधिकारी व त्यांच्या हाताखालील यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली.

देशाच्या भिन्न प्रांतात भिन्न भाषा हे एकच आवाहन त्यांच्या समोरचे आवाहन नव्हते. तर, त्या-त्या राज्यात असणारी तत्कालीन नैसर्गिक स्थिती याचाही विचार करावा लागणार होता. आज जितके दळणवळण सोपे आहे ते त्याकाळी नव्हते अनेक ठिकाणी जायला रस्ते देखील उपलब्ध नव्हते. त्या ठिकाणी मतदान केंद्र स्थापन करणे, कर्मचारी आणि मतपेट्या पोहोचविणे त्यांची सुरक्षा आणि सोबतच पारदर्शकता राखणे आदी आवश्यक होते.

देशात काही भागात पाणीच पाणी तर काही भाग कोरडा आणि हिमाचल लगतच्या जिल्ह्यात बर्फ अशी नैसर्गिक आवाहन देखील होती. या सर्वांचा विचार करून सेन यांनी केलेल्या यशस्वी नियोजनानुसार ६८ टप्प्यांमध्ये ही निवडणूक पार पडली आणि देशाला लोकशाहीतील लोकांनी निवडून दिलेली पहिले सरकार अस्तित्वात आले.

ज्याकाळी संपर्कासाठी दूरध्वनी देखील अत्यंत तोकडे होते. ग्रामीण भागात संपर्क शक्यच नाही. रस्ते नाहीत मतदान यंत्रणा प्रथमच काम करीत आहे आणि मतदार देखील प्रथमच मतदान करीत आहेत अशी ही पहिली निवडणूक आणि त्याचे नियोजन व पूर्णतापर्यंत पूर्ण जबाबदारी पार पाडणारे आयुक्त सुकुमार सेन.

सेन यांनी भारतासोबतच नंतरच्या काळात १९५३ झाली सुदान या देशाचेही पहिले निवडणूक आयुक्त म्हणून काम केले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन सरकारने त्यांचा पद्मभूषण देऊन सन्मान केला. आज निवडणूक तशी सोपी झालीय रस्ते, रेल्वे यांच्या जोडीला हवाई मार्गाची सुविधा आहे. प्रत्येकाच्या हाती ५ तंत्रज्ञानाचा स्मार्टफोन आहे म्हणूनच हे स्मरण आवश्यक. प्रत्येक मतदाराला याचा आरंभ देखील मतदानाची प्रेरणा ठरवा.

**प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
मो.९१९८२३१९९४६६

## श्रीराम जय राम जय जय राम नामजपाने सुंदरकांडची सांगता



**बीड। प्रतिनिधी**

**येथून जवळच असलेल्या श्रीराम संस्थान माळापुरी येथे गेल्या सहा महिन्यापासून ह भ प गोकुळ शास्त्री महाराज तुपे व रामानाचार्य ह भ प नारायण महाराज तुपे यांच्या संयोजनाने भावार्थ रामायण ग्रंथ वाचन चालू आहे .या ग्रंथातील सर्वात अतिशय व भव्य दिव्य असे सुंदर कांड मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये व राम नामाच्या जपात संपन्न झाले.**

काल दिनांक २/४/२०२४ मंगळवारी सकाळी भावार्थरामायण ग्रंथातील सुंदर कांड वाचनास सुरुवात झाली .ग्रंथ वाचनासाठी माळापुरी, पेंडगाव ,बीड व पंचक्रोशीतील वाचक सूचक व श्रोते मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत विलोभनीय कथा श्रवण करण्यासाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सुंदर कांड ग्रंथ वाचनासाठी काही वाचक संवादिनीच्या स्वरात वाचन करत होते तर त्याच तोडीचे सुचक देखील ग्रंथातील ओवी चा अर्थ श्रोत्यांना समजेल अशा भाषेत समजावून सांगत होते. सुंदर कांडाची ही सर्व कथा ऐकताना संपूर्ण परिसर राममय झाला होता . आपले स्वामी श्रीराम यांच्या कामी येण्यासाठी व समुद्र पार करून लंकेचा शोध घेण्यासाठी भगवान श्रीरामाच्या आशीर्वादाने हनुमंत रायाने पार केलेले समुद्राचे अंतर व हे अंतर पार करताना आलेले काही अरिष्ट किती मोठे होते आणि या सर्वांवर मात करून शेवटी हनुमंत रायाने लंकेमध्ये प्रवेश केलाच ही कथा ऐकताना भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले होते. या संस्थांवर आयोजित केलेल्या या सुंदर कांडाच्या महाप्रसादाचे आयोजक समस्त वारकरी, टाळकरी ,भजनी मंडळ व समस्त गावकरी पेंडगाव हे होते . शेवटी सर्वांनी महाप्रसाद सेवन केला. श्रीराम संस्थानचे ह भ प गोकुळ शास्त्री महाराज तुपे व ह भ प नारायण महाराज शास्त्री रामायणाचार्य यांनी सर्व वाचक सूचक मंडळींचा नारळ प्रसाद देऊन सन्मान केला.

# श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस ८२ लाखांचा नफा- माणिक वडवणकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बिना सहकार नहि उद्धार या धोरणावर आधारित राहुन सर्वांना आपलं मानणारी अंबाजोगाई परिसरातील ग्राहक व सभासदांच्या विश्वास व त्यांच्या पाठबळावरच अल्पावधीतच शहरवासीयांची मिनी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२४ अखेर रुपये ८२ लाख एवढा निव्वळ नफा झाल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवणकर, उपाध्यक्ष मनोज लाखेरा आणि मुख्य व्यवस्थापक गजानन कुलकर्णी यांनी प्रसिद्धी पत्रकात जाहीर केले आहे. पतसंस्थेवरील ग्राहकांच्या दृढ विश्वासाने मार्च २०२४ अखेरीस ४८ कोटीच्या ठेवीसह ८२लाखांचा नफा मिळण्याचे कारण म्हणजे पतसंस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांचे बहुमूल्य अभ्यासू मार्गदर्शन आणि ग्राहक तथा सभासदांचा अतूट विश्वास असून यावरच आज पतसंस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असल्याची माहिती वडवणकर यांनी प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.**

जाहीर करण्यात आलेल्या पत्रकात श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेची मार्च २०२४ अखेरची वित्तीय स्थिती पुढीलप्रमाणे मांडली आहे. यामध्ये पतसंस्थेकडे एकूण २२८१सभासद असून, पतसंस्थेचे एकूण भाग भांडवल रुपये २ कोटी ४२ लाख एवढे आहे. पतसंस्थेचा स्वनिधीं हा १० कोटी रुपये एवढा असून त्यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत रक कोटींच्या व्यवसायाची भर पडली आहे. पतसंस्थेकडे सभासदांच्या एकूण ठेवी रुपये ४८ कोटी , तर सभासद व ग्राहकांना मार्च २०२४ अखेर पर्यंत कर्ज वाटप रुपये ३७ कोटी एवढे झाले आहे . तसेच पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स बँक व अन्य ठिकाणची गुंतवणूक ही रुपये २६ कोटी एवढी असून ३१ मार्च २०२४ अखेर(आर्थिक वर्ष २०२३- २०२४) पतसंस्थेस रुपये ८२ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही साधरणतः पस्तीस वर्षापूर्वी एका छोट्याश्या खोलीत केवळ १० हजार रुपयांच्या गुंतवणुकीवर चालू करण्यात आली. आज सभासद , ठेवीदार व ग्राहकांच्या अतूट विश्वासाच्या बळावर श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेने रुपये दहा हजारावरून आज रुपये ४८ कोटीचा टप्पा गाठला आहे . पतसंस्थेने हजारो छोटे मोठे व्यवसाईक , हातगाडी, फेरीवाले, भाजीपाला व फळविक्रेत्याना आर्थिक सहाय्य करून त्यांना त्यांचा व्यवसाय वाढीसाठी मदत करत त्यांच्या कुटुंबाचे आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सदैव प्रयत्न केला आहे . तसेच वेळोवेळी सभासदांच्या मुलांमुलींच्या शिक्षणासाठी , मुलींच्या लग्नासाठी , घर बांधकाम करण्यासाठी तसेच नवीन जागा खरेदी करण्यासाठी देखील पतसंस्थेकडून वेळोवेळी आर्थिक सहकार्य केले आहे . श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही वेळोवेळी अर्थार्जनासोबतच अनेक सामाजिक , शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आघाडीवर असते. पतसंस्थेच्या वतीने प्रतिवर्षी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश , शैक्षणिक साहित्याचे वाटप , रुग्णांना फळ वाटप करण्यात येत आहे. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक ही या पतसंस्थेची मातृबँक म्हणून कार्यरत आहे . योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही आजच्या घडीला केवळ पतसंस्था राहिली नसून ती एक मिनी बँक म्हणूनच ओळखल्या जाऊ लागली आहे . श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था नावारूपाला आणण्यासाठी पतसंस्थेचे सर्व ग्राहक , सभासद , ठेवीदार तसेच कर्जदार यांच्यासह संस्थापक राजकिशोर मोदी , अध्यक्ष माणिक वडवणकर , उपाध्यक्ष मनोज लखेरा , तसेच संचालक कचरूलाल सारडा, ब्रह्मचारी इंगळे , सुनील वाघाळकर , रुपेश चव्हाण , शिरीष भावठाणकार, शेख अब्दुल शेख करीम , सय्यद अमजद , श्रीमती कल्याणी राहुल देशपांडे , श्रीमती जयश्री बाळासाहेब घाडगे यांच्यासह ऍड. दयानंद लोंढाळ, जावेद छोटू गवळी यांच्यासह पतसंस्थेचे कर्मचारी संतोष मठपती, नारायण हाके, रोहित वाघमारे, अनिकेत पाणकोळी, रविंद्र लंगे, विनोद कांबळे, तसेच पतसंस्थेचे पिग्मी प्रतिनिधी राम भस्मे, विजयकुमार गजरे, प्रकाश कदम, विशाल देशमुख यांच्यासह अजय रापतवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात उल्लेखित केले आहे.

# कोल्हापूरच्या अंबादेवी मुर्तीला तडे

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीच्या गळ्याखालच्या भागाची मोठी झीज झाली आहे. तसेच मूर्तीचे नाक, ओठ, हनुवटीवर तडे गेले असून ते २०१५ साली झालेल्या रासायनिक संवर्धनात वापरल्या गेलेल्या साहित्यांच्या अवशेषांची आहे. मूर्तीचा चेहरा व किरीट या भागाचे तातडीने संवर्धन करण्याची गरज असल्याचा निष्कर्ष तज्ञांनी दिला आहे.**

अंबाबाई मूर्ती संवर्धनासंबंधीचा दावा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर कोल्हापूर यांच्यासमोर सुरू आहे. या दाव्यात वादी गजानन मुनीश्वर व इतर यांनी पुरातत्व खात्याच्या निवृत्त अधिका-यांकडून मूर्तीची पाहणी व्हावी अशी मागणी केली होती. न्यायालयीन आदेशानंतर पुरातत्त्व खात्याचे निवृत्त अधिकारी आर. एस. त्र्यंबके व विलास मांगीराज यांनी १४ व १५ मार्च रोजी केलेल्या पाहणीचा अहवाल गुरुवारी न्यायालयात सादर झाला. आठ पानाच्या या अहवालात त्यांनी २०१५ साली अंबाबाई मूर्तीच्या संवर्धन प्रक्रियेसाठी वापरले गेलेले साहित्य मूळ पाषाणाशी जुळवून घेऊ न शकल्याने त्याचे तडे जाऊन थर निघत असल्याचा निष्कर्ष काढला आहे. तसेच मूर्तीवरील अन्य ठिकाणच्या लेपाला देखील तडे असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. या सुनावणीला ॲड. नरेंद्र गांधी, ॲड. ओंकार गांधी, वादी गजानन विश्वनाथ मुनीश्वर, अजिंक्य मुनीश्वर, लाभेश मुनीश्वर, प्रतिवादी दिलीप देसाई, ॲड. प्रसन्न मालेकर उपस्थित होते.

# मोरेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**मोरेवाडी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव पासून जवळच असलेल्या मोरेवाडी येथे ह भ प नामदेव महाराज भोसले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन मित्ती फाल्गुन वद्य १३ दिनांक ७/४/२०२४ रविवारी प्रारंभ होणार आहे. नाम सप्ताहाचे हे सलग वे३२ वर्ष आहे .या नाम सप्ताह मध्ये मान्यवर महाराज मंडळींची प्रवचन सेवा तसेच काकडा भजन ,विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन ,रामायण कथा, हरिपाठ व रोज रात्री सांप्रदायिक हरी कीर्तन सेवा होणार आहेत यामध्ये दिनांक/४/२०२४ रविवारी ह भ प शांतीब्रह्म गुरु नवनाथ बाबा महाराज श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी, ह भ प नामदेव महाराज भोसले ,हभप रामेश्वर महाराज गुंड पाटील, ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव ,ह भ प शंकर महाराज झाडे , ह भ प भगवान महाराज राजपूत श्रीक्षेत्र हरिश्चंद्र पिंपरी, आत्माराम महाराज चव्हाण या मान्यवर कीर्तनकार महाराज मंडळींची सांप्रदायिक कीर्तन सेवा संपन्न होणार आहे दिनांक १४/४/२०२४ रविवारी सकाळी११ ते १ या वेळेमध्ये ह भ प भगवंत महाराज पुरी श्रीक्षेत्र संस्थान भाटेपुरी संस्थान यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होणार आहे तरी या सर्व नाम सप्ताहात मधील कार्यक्रमाचा मोरेवाडी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रवणभक्तीचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी मोरेवाडी यांनी केले आहे.

## पान १वरून...

**वंचितकडून परभणीत**

आतापर्यंत १९ लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारी जाहीर केले आहेत. त्यापैकी तीन उमेदवार वंचितकडून बदलण्यात आले आहेत. रामटेकमध्ये वंचितकडून यापूर्वी शंकर चहांदे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, तांत्रिक कारणामुळे माघार घेत असल्याचे सांगत शंकर चहांदे यांनी काँग्रेसचे अपक्ष बंडखोर उमेदवार किशोर गजभिये यांना पाठिंबा जाहीर केला होता. तर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात वंचितने पूर्वी सुभाष पवार यांना रिंगणात उतरवले होते. मात्र, त्यानंतर वंचितने अचानक निर्णय बदलत अभिजित राठोड या तरुण चेहऱ्याला संधी देण्याचा निर्णय घेतला होता.

------------

**वडवणीत ६१ लाखाच्या**

करण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केली व ती सत्य असल्याचे भासवून सदर कागदपत्रे शासकीय कामकाजानिमित्त वापरली व संस्थेचे शासकीय मुल्यांकन रू ४७,६२,५००/- व खरेदीखतावर दर्शवण्यात आलेली रक्कम रू १३,९०,१०१/- अशा एकूण ६१,५२,६०१/- इतक्या रक्कमेचा अपहार करून आपआपसात संगणमताने फसवणुक केली आहे. तर ही फसवणुक दि.३ संप्टेबर २०१७ ते दि.२८ नोंव्हेबर २०२३ या कालवधीमध्ये घडली आहे. या प्रकरणी सहा.निबंधक सहकारी संस्था जिल्हा उप निबंधक अहमदनगर येथील अमोल विठ्ठलराव माने, लेखापरीक्षक डी. बी. गोरे, शिवाजी दिलीप नेहरकर, आशा प्रकाश डिगे (रा.वडवणी) तसेच लक्ष्मी महिला यंत्रमान सहकारी संस्था वडवणीचे संचालक मंडळ यांच्या विरोधात गुरनं. ८२/२०२४ कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७०, ४७१, ३४ भांदवी नुसार गुन्हा दाखल केला आहे. तर या प्रकरणी वडवणी पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरिक्षक अमन सिरसट हे करत आहेत.

------------

**शनिवारपासून राज्यात तीन**

तर खानदेश, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सोलापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यातही काही ठिकाणी पावसाचा अंदाज असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले. दुसरीकडे देशातील उच्चांकी तापमान आंध्र प्रदेशातील नांद्याल येथे ४३ अंश सेल्सिअसवर होते. राज्यात सोलापूर येथे ४२.२ अंशाची नोंद झाली.

------------

**भाजपने शिंदे, पवारांना ताटाखालच**

भाजपच्या सांगण्यावरुन त्यांना उमेदवार बदलावे लागत आहेत. याआधीही शिवसेना भाजपची युती होती. पण तेव्हा शिवसेनेचा उमेदवार कोण असावा, हे सांगण्याची भाजपची कधी हिंमत झाली नाही. कारण उमेदवार हा तो पक्ष ठरवत असतो. मित्र पक्षाला त्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नसतो. पण इथे भाजपने शिंदे, पवारांना ताटाखालचे मांजर बनविले आहे, असे दानवे म्हणाले. सध्या महायुतीची अवस्था वाईट झाली आहे. त्यांना राज्यात कुठेही कुवतीचे उमेदवार मिळत नाहीत, असा आरोपही दानवे यांनी केला. छत्रपती संभाजीनगरात शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने आपला उमेदवार आधीच जाहीर केला आहे. पण महायुतीचा उमेदवार अजूनही ठरलेला नाही. महायुतीत ही जागा शिंदे गट लढविणार असून त्यांच्याकडून पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे नाव निश्चित झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, पालकमंत्री भुमरे हे लोकसभा निवडणूक लढविणार नाहीत, असा दावा दानवे यांनी केला. भुमरे लोकसभा लढविणार नाहीत, हे मी शंभर टक्के सांगतो, असेही ते म्हणाले.

------------

**सोनिया गांधी यांच्यासह १४**

राज्यसभेवर निवडून आलेले केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी उडीया भाषेतून शपथ घेतली. राज्यसभा सदयत्वाची शपथ घेणाऱ्या इतर १४ खासदारांमध्ये आंध्रप्रदेशातील वायएसआर काँग्रेसचे गोला बाबूराव, मेघा आर. रेड्डी, वाय. व्ही. सुब्बारेड्डी, बिहारमधील जदयूचे संजय कुमार झा, कर्नाटकातील कांग्रेसचे सय्यद नासीर हुसैन, अजय माकन, ओडिशातील बिजदचे सुभाशीष खुंटिया, देवाशीष समंत्रय, भाजपचे मदन राठौड़, तेलंगणमधून टीआरएसचे रवी सी. वी. राजू, उत्तरप्रदेशातील भाजपचे आर.पी.एन सिंह आणि पश्चिम बंगालमधील भाजपचे समीक भट्टाचार्य आदींचा समावेश आहे.

------------

**केजरीवाल यांना मुख्यमंत्री पदावरून**

कारण देत केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची मागणी केली. कोर्टाने सांगितले की, ते या मुद्यावर निर्णय घेऊ शकत नाहीत आणि दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर (एलजी) किंवा भारताचे राष्ट्रपती यावर निर्णय घेऊ शकतात. सरकार काम करत नाही हे आपण कसे म्हणू शकतो? दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर हे निर्णय घेण्यास पूर्णपणे सक्षम आहेत. त्यांना (एलजी) आमच्या मार्गदर्शनाची गरज नाही. त्याला सल्ला देणारे आम्ही कोणी नाही. कायद्यानुसार जे काही करायचे ते करतील, असेही न्यायालयाने सांगितले आहे. न्यायालयाने पुढे सांगितले की, ते यामध्ये हस्तक्षेप करणार नाही आणि भारताचे राष्ट्रपती किंवा एलजी यावर निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे याचिकाकर्ता संबंधित प्राधिकरणाकडे जाऊ शकतो, असे त्यात म्हटले आहे. त्यानंतर याचिकाकर्त्याने याचिका मागे घेतली.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. ५ एप्रिल २०२४



## एकदरा येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह, शिवमहापुराण व ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन

माजलगाव : तालुक्यातील एकदरा येथे आज दि. ४ एप्रिल २०२४ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होणार असुन शिवमहापुराण कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन भाविक - भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कथा प्रवक्ते विलास महाराज एकदरेकर हे असुन ज्ञानेश्वर पारायणाचे नेतृत्व रामेश्वर म. मुळे कांबीकर हे करणार आहेत. या सप्ताहात पारायण, कथा, काकडा, हरिपाठ व हरिकिर्तने होणार आहेत. दि.४ एप्रिल रोजी पहिल्या दिवशी विष्णुपंत म. लोंढे यांचे हरिकिर्तन होणार आहे तर नंतरच्या दिवशी रामेश्वर म. मुळे कांबीकर, ज्ञानेश्वर माउली म. करंजीकर, इंद्रजीत म. रसाळ तिगावकर, कैलास म. चव्हाण मुंबईकर, हरिदास म. उबाळे भेंड टाकळी, पांडुरंग म. शितोळे शास्त्री व दि. ११ एप्रिल रोजी सप्ताहाची सांगता भागवताचार्य उमेश म. दशरथे यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार आहे. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले असुन भाविक - भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# माजलगाव तहसीलदाराच्या आशीर्वादाने वाळू माफियांचा हैदोस

## गस्ती पथक फक्त नावालाच,आर्थिक व्यवहारातून होते वाळूची तस्करी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्याला चहुबाजूने गोदावरी,सिंधफाणा,सरस्वती या नदी पात्राने व्यापले असल्यामुळे तालुक्यांमध्ये मुबलक वाळू असल्याकारणाने याठिकाणी अनेक वाळू तस्कर निर्माण झाले आहेत.या वाळू तस्करांना गंगेचीच काय तर नदी,ओढयाची वाळू देखील पुरेनाशी झाली आहे.

गोदावरी व सिंदफना नदी पात्र पोखरून अक्षरशः चिंधड्या चिंधड्या केल्या जात आहेत. मात्र माजलगाव तहसीलदार व महसूलचे अधिका-यांचे आर्थिक व्यवहारातून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

तालुक्यात असणाऱ्या सादोळा, मंजरथ, सांडस चिंचोली, गोविंदपुर, आबेगाव,छत्र बोरगाव, सोमठाणा, सुरुमगाव, गंगामसला,शुक्ल तीर्थ



लिमगाव, मोगरा,रिधोरी, काळेगाव थडी, नागडगाव या सर्व ठिकाणी वाळूचे प्रमाण मुबलक असल्यामुळे दिवसाढवळ्या वाळू तस्कर वाळूची चोरटी वाहतूक करत आहेत हीच वाळू,वाळू माफीया तालुक्यातील चालु असलेल्या अनेक ठिकाणच्या बांधकामावर ढिगारे टाकत असून यातून ते अवाच्या सव्वा नफा मिळवत आहेत,व सर्वसामान्य जनतेची आर्थिक लूट करत आहेत. मात्र माजलगाव तहसीलदार व महसूल अधिकारी हे आर्थिक व्यवहारातून स्वत:च्या फायद्यासाठी तालुक्यात येऊन पडलेल्या साधं वाळूच्या ढिगाऱ्याची देखील चौकशी करत नाहीत की, बांधकामासाठी वाळू कोठून उपलब्ध झाली. त्याची रॉयल्टी पावती आहे का अशी एकही कारवाई माजलगाव तहसीलदार व महसूल अधिकाऱ्यांनी केलेली नसल्यामुळे यांनी नेमून दिलेले गस्ती पथक देखील नावालाच आहे.

तालुक्यातील आनेक ठिकाणाहून वाळू माफिया वाळू तस्करी करून मधल्या असणाऱ्या लोणगाव मार्गे रात्रीच्या वेळी चोरटी वाळू वाहतूक करतात. असेच १५ दिवसापूर्वी सकाळी ०८ ते८:३० च्या दरम्यान वाळू वाहतूक करणारा टेम्पो अवैध वाळू वाहतूक करत असल्याची माहिती दैनिक एका ग्रामीण पत्रकारांला मिळाली ते याची शहानिशा करण्यासाठी लोणगाव मार्गे निघाले असता चोरटी वाळू वाहतूक करणाऱ्या टेम्पोने रस्त्यावरच वाळू टाकून पलायन केले.याची माजलगाव तहसीलदार यांना माहिती देऊन ही वाळू माजलगाव तहसील कार्यालय येथे आणून जमा करण्यात आली. जर दिवसा ढवळ्या वाळूची अनाधिकृत तस्करी होत असेल तर माजलगाव तहसीलदार, महसूल अधिकारी व गस्ती पथक हे अर्थपूर्ण देवाण घेवाणीतूनच असे प्रकार घडत आहेत. या अशा कर्तव्यहीन,भ्रष्ट व बेजबाबदार अधिकाऱ्यामुळेच शासनाचा कोटीवधीचा महसूल बुडत आहे. माजलगाव तहसीलदार हे वाळू माफीयांना पाठबळ देत असून यामुळे गोदामाई पोखरली जात आहे व बांधकाम करणाऱ्या सर्वसामान्यांची आर्थिक लूट होत आहे.हे सर्व माजलगाव तहसीलदार, महसूल अधिकारी, गस्ती पथक यांच्या आशीर्वादानेच होत असल्याची चर्चा तालुक्यातील नागरीकांतुन होत आहे.

## भारतीय निवडणूक आयोगाने ठरविलेले ओळखपत्र दाखवून मतदान करता येते : जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी

बीड । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरू असून चौथ्या टप्प्यातील सोमवार दिनांक १३ मे रोजी ३९ बीड या मतदारसंघात मतदान होणार आहे.


भारतीय निवडणूक आयोगाने नमूद केलेल्या ओळखपत्राच्या आधारे मतदान करता येते असे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे. यानुसार अधिकाधिक मतदारांनी मतदान प्रक्रियेत भाग घेऊन आपले अमूल्य योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. भारतीय निवडणूक आयोगाने मतदारांसाठी काही सुविधा उपलब्ध करून दिलेली असून मतदान ओळखपत्र एपीक कार्ड व्यतिरिक्त काही दुसरे ओळखपत्र असल्यासही मतदान करता येते असे जाहीर केलेले असल्याचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले.

यानुसार मतदान एपिक कार्ड व्यतिरिक्त आधार कार्ड, मनरेगाची जॉब कार्ड , कुठल्याही बँकेचे पासबुक ज्यावर मतदाराचा छायाचित्र असेल तसेच पोस्ट ऑफिस चे पासबुक ज्यावर मतदारांचे छायाचित्र असेल. केंद्रीय कामगार मंत्रालयाच्यावतीने दिलेले विमा स्मार्ट कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीकडून रजिस्टर जनरल इंडिया ने दिलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र, ज्यावर छायाचित्र असेल असे निवृत्तीचे कागदपत्र , शासकीय तसेच निमशासकीय संस्थेकडून कर्मचाऱ्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र, खासदार, आमदार, विधान परिषदेचे सदस्य यांनी छायाचित्रावर दिलेले ओळखपत्र तसेच दिव्यांग व्यक्ती ज्यांना केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडून युनिक डेसिबिलिटी ओळखपत्र मिळालेले आहेत. अशा कुठल्याही एका ओळख पत्राचा वापर हा मतदान करतेवेळी मतदान केंद्रात सोबत घेऊन गेल्यास मतदान करता येत असल्याचे बीड जिल्ह्याच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.

# पाटोदा पोलीसांनी १२ जुगाऱ्यासह मुद्देमाल केला जप्त

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार यांना दिनांक ३ ४ २०२४ रोजी गोपनीय माहिती मिळाल्याने श्री अनमोल केदार यांनी आपल्या अधिपत्या खालील श्री गाडे, श्री काटकर, वाघ, जायभाय, काकडे, कोळेकर, पठाण स्टाफ यांना सदरची माहिती कळवून पंचासह कारवाई करण्याकरिता तात्काळ घटनास्थळी रवाना केले.. सदरची कारवाई मौजे दासखेड येथे करण्यात आली असून दासखेड येथील नदीच्या बाजूला असलेल्या झाडाखाली जुगाराचा खेळ चालू असताना पाटोदा पोलीस स्टेशन स्टाफने अचानकपणे छापा मारला



असता काही इसम चाहूल लागल्यावरून मोकळ्या रानात पळाले असता त्यांचा पाठलाग करून पकडले असे सदरच्या ठिकाणी एकूण १२ आरोपी जुगार खेळ पैशावर खेळत असताना मिळून आले सदरच्या कारवाईमध्ये १) पांडुरंग संदीपान कोकाटे वय ५१ वर्ष २) साहेबराव किसन कोकाटे वय ५५ वर्ष ३) अनिल सिताराम कोकाटे वय ६० वर्ष ४) लक्ष्मण भगवानराव मोरे वय ३८ वर्ष ५) दत्तात्रय बन्सीधर कोकाटे वय ४४ वर्ष ६)) सुभाष शांतीलाल वाघीरे वय ५६ वर्ष ७) दत्तात्रय बापुराव कोकाटे वय ४८ वर्ष ८) हरीभाऊ भिमराव कोकाटे वय ५२ वर्ष ९) प्रशांत आणासाहेब कोकाटे वय ४४ वर्ष १०) गणेश मारोती कोकाटे वय ४५ वर्ष ११) रमेश काकासाहेब कोकाटे वय ३१ वर्ष सर्व रा. दासखेड ता. पाटोदा १२) अनिल विठठल बाबर रा. हिंगणी ता. करमाळा जि. सोलापुर यांना ताब्यात घेतले असून बेकायदेशीर रित्या पत्यावर पैसे लावुन स्वतःच्या फायदयासाठी तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना जुगाराचे साहीत्य, रोख ११२४० रुपये व जुगार खेळण्यासाठी येणे जाणे साठी वापरलेल्या चार मोटार सायकल किमत १,९५,००० रुपये असा एकुण २०६,२४० रुपये सह मुद्देमालासह जप्तीची कारवाई करून सदर आरोपीतांविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक श्री माधव नारायण काटकर यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पाटोदा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री पांडकर साहेब. मा.उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर, यांच्या मार्गदर्शनाखाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार, पोलीस उपनिरीक्षक श्री भागवत गाडे, पोलीस उपनिरीक्षक श्री माधव काटकर, सहाय्यक फौजदार बाळासाहेब वाघ, पोलीस हवालदार सुनील जायभाय, पोलीस हवालदार संतोष काकडे, पोलिस अंमलदार सचिन कोळेकर व रियाज पठाण यांनी केली आहे.

# रेहान, रियाजचा पहिला रोजा पूर्ण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या पाच तत्वे नमाज, कलमा, हज,जकात, पैकी एक असलेले , रोजा सध्या कडक उन्हाळा सुरु आहे त्यात मुस्लिम समाजाचा पवित्र महिना या महिन्यात मुस्लिम बांधव ,भगिनी लहान थोर सर्व जन उन्हाळ्याला न घाबरता पहाटे साडे चार ला उठून अल्प आहार घेतात व त्याच वेळी पाणी पितात त्या नंतर संपूर्ण दिवस भर पाण्याचा एक घोट पण घेत नाही संध्याकाळ सहा पंचेचालीस ला रोजा इफ्तार करतात एवढा कडक उपवास असून देखील मुस्लिम बांधव आपली दैनंदिना चे काम करतात आपण धरलेले रोजे पूर्ण करतात

तसेच आज अंबाजोगाई शहरातील राहणारे सय्यद वजीर भाई यांचा नातू ( हैदराबाद



बँकेतील) व पत्रकार सय्यद नईम यांचे मुले रियाज,रेहान यांनी आज आपला रोजा पूर्ण केला

घरातील सर्वच मोठे रोजा करतात म्हणून आपणही रोजा करावा अशी इच्छा बऱ्याच वेळेस बोलून दाखवली होती मी आज इच्छा पूर्ण झाली आजचा दोघांनी सकाळी उठून अल्पहार घेतला व पहाटेची नमाज पूर्ण करून दिवसभर कुराण पठण करत राहिले

त्यांच्या रोजाला प्रोत्साहन म्हणून आज आजी आजोबा आत्या चुलते नजीर, समीर यांनी नवीन कपडे घेऊन पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला इफ्तारी नंतर नातेवाईकांनी भेटून फोन करून दोघांना खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# ओबीसीचे एल्गार ना.भुजबळ यांचा फोटो विसरणाऱ्या पंकजाताई मुंडेनी माळ्यांना विसरावे- संतोष रासवे

**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे पण ते ओबीसी समाजाच्या कोट्यातले नसावे यासाठी एल्गार करणारे अख्या ओबीसी समाजाचे नेतृत्व करीत असलेले ना.छगन भुजबळ यांच्या फोटो चा विसर आज ५एप्रिल रोजी बीड येथे आयोजित पंकजाताई मुंडेंनी यांच्या बैनर मध्ये विसरणाऱ्या पंकजा मुंडेंनी माळा समाजाच्या मतदाना हि विसरावे अशी प्रखड प्रतिक्रिया माजलगाव तालुक्यातील




माळी समाजाचे उद्योन्मुख नेते संतोष रासवे यांनी प्रसिद्धि पत्रकाद्वारे व्यक्त केली आहे. रासवे यांनी प्रसिद्धि पत्रकात पुढे म्हटले आहे की,ओबीसी आरक्षण बचाव करण्यासाठी ना.भुजबळ यांनी मंत्री पदाची लालसा न ठेवता राज्यभर ओबीसीच्या एल्गार सभा घेतल्या आहेत आणि त्याचीच एक महासभा बीड येथे आयोजित करण्यात आली होती. या महासभेला ओबीसी समाजाचे नेतृत्व करीत आहे अशी वल्गना करणाऱ्या पंकजा ताई मुंडेंनी पाठ फिरवली होती मात्र आता पुनः त्या ओबीसी महिला म्हणून भाजप-रा.कॉ.(अजित पवार),शिवसेना (शिंदे गट),रिपाइं (आठवले),रासपा यांच्या कडुन लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरल्या आहेत. त्यांचा प्रचार हि सुरु झाला त्याचाच एक भाग म्हणून आज ५एप्रिल शुक्रवार रोजी बीड येथे प्रचार कार्यालयाचा आरंभ होत आहे त्या निमित्ताने 'महाविजय-२०२४' या मुख्य मथळ्याखाली सोशलमीडिया च्या माध्यमातून बैनर बाजी करण्यात आली आहे यात महायुतीतील नेत्यांच्या फोटोत छगन भुजबळ यांचा फोटो कुठेही दिसुन येत नाही. याचा परिणाम बीड जिल्ह्यातील माळी समाजाचे नेतृत्व सुभाष राऊत यांच्या आदेशानुसार पंकजा ताई मुंडे यांना दिसुन येतील असे शेवटी प्रसिद्धि पत्रकात संतोष रासवे यांनी सांगितले आहे.

# अनधिकृत शस्त्र बाळगणाऱ्यांनी तात्काळ शस्त्र जमा करण्याचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू झाली असून चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी ३९ बीड मतदार संघात मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघात कुणाकडे अनाधिकृत शस्त्र असल्यास ते जमा करण्याचे सक्त आदेश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या बैठकीत पोलीस अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात आज सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ ची कायदा व सुव्यवस्थेची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बोलत होत्या. यावेळी



जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर जिल्हाअधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सर्व जिल्ह्याचे सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अनाधिकृत शस्त्र मोठ्या प्रमाणात आहेत. अनधिकृत शस्त्र जमा न करणाऱ्यांवर पोलिसांनी कायदेशीर कारवाई करावी.

अनाधिकृत शस्त्र जमाबाबतची आढावा बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा निर्णय निवडणूक अधिकारी यांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या सीमेवरचा नाकेबंदीचा पॉईंट दुसऱ्या जिल्ह्याच्या सीमेलगत असावा असे सुचविले. यामुळे दोन्ही जिल्ह्यातून अवैध होणारी वाहतूक अथवा अन्य कायदा सुव्यवस्था बिघडणाऱ्या गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यात येईल. जर दोन जिल्ह्यातील अंतर अधिक असेल अशावेळी अधिकचा बंदोबस्त लावण्यात यावा असे यावेळी निर्देशित केले.

जिल्ह्यात १४ ठिकाणी नाकेबंदी करण्यात आली असून या ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पोलिसांना मूलभूत सुविधा प्रदान कराव्यात अशा सूचना यावेळी जिल्हा दंडाधिकारी यांनी केल्या.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील कोणत्याही गावाला गावबंदी करता येणार नाही तसे कुठलेही बोर्ड लावता येणार नाही तसे बोर्ड असल्यास ते काढून घ्यावे, आणि न्यायालयाची अवहेलना केली असल्यास कायदेशीर कारवाई करावी असेही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्देशित केले.

एखाद्या घटनेची संभाव्य माहिती मिळत असल्यास ती होण्यापूर्वीच योग्य ती कारवाई पोलिसांकडून करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांच्याकडून करण्यात आली.जे पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी निवडणुकीच्या कामावर आहेत त्यांच्यासाठी पोस्टल मतदानाचा उपयोग करन्यात आलेला आहे. यासाठी सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबत भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सुविधा केंद्र तयार करून पोस्टल मतदानासाठी ग्राह्य असलेल्या मतदारांचे मतदान करून घ्यावे, अशा सूचना यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी केल्या.

# आधुनिक काळाच्या ओघात ग्रामीण भागातील चिरेबंदी वाडे नामशेष होण्याच्या मार्गावर

**ज्योतिराम पाढरपोटे। माजलगाव**

पूर्वीच्या काळी माळवदाचे घर, मोठमोठे दगडी चिरेबंदी वाडे गावोगाव असायचे, पण आता आधुनिक काळात सिमेंट, विटाच्या जमान्यात खेड्यापाड्यांपासून ते शहरापर्यंत अनेक मजली घरे होऊ लागली आहेत. काळाच्या ओघात ग्रामीण भागातील पूर्वी दिसणाऱ्या चिरेबंदी वाड्याची पडझड होऊन ती नामशेष होऊ लागली असल्याचे चित्र आहे.

माजलगाव तालुक्यात पूर्वीच्या काळी सर्वसामान्य लोकांकडे मातीच्या भेंड्याची व देशमुख,कुलकर्णी, जोशी,पाटील, शिंदे,गुरुजी यांच्याकडे घडीव दगडाचे चिरेबंदी वाडे असायचे.या वाड्यात अनेक खोल्या आतल्या आत असायच्या आणि घरात गारवा कायम टिकवून राहायचा.या वाड्याचा रूबाब वेगळाच असायचा, पण जसजसे आधुनिक तंत्रज्ञान अवगत होऊ लागले तसे दगडाची बांधकामे लोप पावत चालली.त्या जागी सिमेंट,विटांनी मोठमोठ्या इमारती, घरे उभारू लागली. गावखेड्यांकडील चिरेबंदी वाडे कालबाह्य होऊ लागली.माजलगाव तालुक्यातील मोगरा, लोनगाव,उमरी,डाकेपिंपरी, सोन्नाथडी, गुंजथडी, सादोळा,







गंगामसला, पात्रुड, तालखेड, राजेगाव,खरात आडगाव, शिंपेटाकळी, सांडसचिंचोली, बोरगाव, आंबेगाव सह अनेक गावात एकेकाळी दिमाखदार दिसणारे,घडीव दगडांनी बांधलेल्या वाड्यांची पडझड झाल्याचे पहायला मिळत आहे.पण काळ बदलला तसे लोक आणि आवडही बदलल्याने आता दगडी बांधकाम करणारे लोक बोटावर मोजता येतील एवढे राहिले.

पूर्वीच्या काळी एकत्रित कुटुंब असायचे.त्यातून सामाजिक सलोखा व कुटुंबप्रमुखाचा धाक आणि दरारा राहायचा.गावातील एकमेकांच्या मदतीतून वाडे उभा राहायचे, पण आता एकत्रित कुटुंब पद्धत मोडकळीस आली. गाव सोडून लोक शेतात स्थलांतर झाल्याने हे वाडे आता नामशेष होऊ लागल्याचे मोगरा येथील दिलीप शिंदे यांनी सांगितले.

### अनेक चौकटी उभा राहिल्या

पूर्वी एकत्र कुटुंब असल्याने एकाच वाड्यात अखख कुटुंब राहायचं,पण आता एकाच कुटुंबातील सदस्य विखुरले गेल्याने एका चौकटीऐवजी अनेक चौकटी करीत भिंती उभा राहिल्याचे दिसून येत आहे.पूर्वी दगडाच्या कामाला मागणी असायची. घडीव दगडाचे काम केल्याने पैसा मिळायचा.तेव्हा खर्च कमी आणि समाधान मिळायचे,पण आता दगडी कामे कोणीच करीत नसल्याने दगडी बांधकाम मजुरांवर उपासमारीची वेळ आल्याचे जुने घडीव दगडी बांधकाम करणारे मजुर पण राहिलेले नाहीत.

माळवद हा मराठी भाषेतील ऐतिहासिक शब्द आहे.या शब्दाचा अर्थ ''मातीच्या घराची गच्ची किंवा माळवद किंवा धाबें '' असे सुद्धा म्हणू शकतो. घरातील वातावरण नियंत्रीत ठेवण्याची पारंपरिक पद्धत म्हणजे माळवद. पूर्वीच्या काळी माळवदाचा वरील भाग हौदासारखा करत असत.

cmyk

# सेंद्रिय शेतीची ६४ लाख हेक्टरवर लागवड

## ४ वर्षात देशातील क्षेत्र दुपटीने वाढले

पुणे : केंद्र सरकारकडून देशातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. अशातच आता फेब्रुवारी २०२४ पर्यंत देशातील सेंद्रिय शेतीचे क्षेत्र ६४,०४,११३ हेक्टरपर्यंत वाढले असल्याचे समोर आले आहे. जी २०१९-२०२० मध्ये देशभरात २९,४१,६७८ हेक्टरवर नोंदवली गेली होती. अर्थात मागील चार वर्षांमध्ये देशातील सेंद्रिय शेतीच्या क्षेत्रामध्ये दुपटीने वाढ नोंदवली गेली आहे. राष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन कार्यक्रमाच्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे.

राष्ट्रीय सेंद्रिय शेती केंद्राच्या आकडेवारीनुसार, २० वर्षांपूर्वी २००३-०४ मध्ये देशात केवळ ७६,००० हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय पिकांची लागवड केली जात होती. ज्यात २००९-१० मध्ये वाढ होऊन, ते १०,८५,६४८ हेक्टर इतके नोंदवले गेले होते. तर सध्याच्या केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०१९-२०२० मध्ये देशातील सेंद्रिय शेतीखालील क्षेत्र हे २९,४१,६७८ हेक्टर इतके नोंदवले गेले. ज्यात २०२०-२१ मध्ये ३८,०८,७७१ हेक्टरपर्यंत वाढ झाली. तर २०२१-२२ मध्ये देशातील सेंद्रिय शेतीचे क्षेत्र हे



५९,१२,४१४ हेक्टर इतके नोंदवले गेले होते. ज्यात फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत ६४,०४,११३ हेक्टरपर्यंत वाढ झाली आहे. अर्थात २०१९-२०२० या मागील चार वर्षांच्या तुलनेत सेंद्रिय शेतीच्या क्षेत्रामध्ये दुपटीने वाढ नोंदवली गेली आहे.

उत्पादन घटते का?

बऱ्याचशा शेतकऱ्यांना वाटत असते की सेंद्रिय शेती केल्यामुळे शेतीतील उत्पादनात घट होते. अर्थात सेंद्रिय शेतीचे प्रमाण वाढले तर भारतात अन्नधान्याची कमतरता जाणवू शकते. मात्र, केंद्रीय कृषी संशोधन परिषदेच्या वैज्ञानिकांनी शेतकऱ्यांच्या मनातील ही शंका फेटाळून लावली आहे. सेंद्रिय शेतीमुळे पिकांच्या उत्पादनात घट न होता गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. दरम्यान, सेंद्रिय शेती करण्यात मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र, सिक्कीम ही राज्य आघाडीवर आहेत.

प्रमाणपत्र आवश्यक असते

शेतकऱ्यांना वाटते की आपण रासायनिक कीटकनाशके आणिरासायनिक खते न वापरता, शेती करतोय म्हणजे आपला उत्पादित शेतमाल सेंद्रिय असेल. मात्र असे नसते. सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रमाणपत्र आवश्यक असते. शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतमालाची विक्री तेव्हाच होते. जेव्हा त्यांच्याकडे प्रमाणपत्र असते. त्यामुळे सेंद्रिय शेती करताना हे प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक असते. दरम्यान, सेंद्रिय शेती करणारे असे अनेक शेतकरी आहेत. ज्यांना प्रमाणपत्र मिळालेले नाही. ज्यामुळे यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६३ : पुण्याच्या लाल महालावर अचानकपणे केलेल्या हल्ल्यात शिवाजीमहाराजांनी शाहिस्तेखानाची बोटे छाटली.
१६७९ : राजारामास पकडण्यासाठी झुल्फिकारखानाने रायगडास वेढा दिला असता राजाराम रायगडावरुन प्रतापगडास गेला. पुढे प्रतापगडासही शत्रूने वेढा दिल्यावर राजारामास पन्हाळगडावर जावे लागले.
१९३० : २४१ मैल प्रवास करुन महात्मा गांधी यांनी दांडीयात्रा संपविली.
१९४९ : भारत स्काऊट गाईडची स्थापना
१९५५ : प्रकृती अस्वास्थ्यामुळे विन्स्टन चर्चिल यांनी ब्रिटनच्या पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला.
१९५७ : कम्युनिस्ट पक्षाने भारतात प्रथमच केरळमध्ये निवडणूका जिंकल्या आणि इ. एम. एस. नंबुद्रीपाद हे केरळचे मुख्यमंत्री झाले.
२००० : अभिनेत्री सुलोचना यांच्या हस्ते डी. डी. १० या मराठी उपग्रह वाहिनीचे 'सह्याद्री' असे नामकरण करण्यात आले.
२००० : जळगाव नगरपालिकेच्या १७ माजली इमारतीचे उद्‍घाटन.
१९९९ : राष्ट्रीय समुद्री दिवस भारताच्या मालकीचं पहिलं जहाज एस.एस. लॉयल्टी लंडनला रवाना झालं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२७ : सर जोसेफ लिस्टर - निर्जंतुकीकरणामुळे जखमा लवकर बर्या होतात हे सिध्द करणारा ब्रिटिश शल्यविशारद (मृत्यू: १० फेब्रुवारी १९१२)
१८५६ : बुकर टी. वॉशिंग्टन - अमेरिकन निग्रोंच्या प्रश्नासाठी कार्य करणारे समाजसेवक, लेखक, वक्ते व शिक्षणतज्ञ (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९१५)
१९०८ : बाबू जगजीवनराम - स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, राजकारणी, केंद्रीय मंत्री व भारताचे उपपंतप्रधान (मृत्यू: ६ जुलै १९८६)
१९०९ : अल्बर्ट आर. ब्रोकोली - 'जेम्स बाँड' पटांचे निर्माते (मृत्यू: २७ जून १९९६)
१९१६ : ग्रेगरी पेक - हॉलीवूड अभिनेता (मृत्यू: १२ जून २००३)
१९२० : डॉ. रफिक झकारिया - महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री आणि लोकसभा सदस्य (मृत्यू: ९ जुलै २००५)
१९२० : आर्थर हॅले - इंग्लिश कादंबरीकार (मृत्यू: २४ नोव्हेंबर २००४)
१९६६ : भारतीय-अमेरिकन अभिनेते आणि निर्माते आसिफ मांडवी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१७ : शंकरराव निकम - स्वातंत्र्यशाहीर
१९२२ : पंडिता रमाबाई - विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (जन्म: २३ एप्रिल १८५८)
१९४० : चार्लस फ्रिअरी तथा दीनबंधू अ‍ॅन्ड्र्यूज - इंग्लिश मिशनरी, महात्मा गांधींचे जवळचे मित्र, समाजसेवक आणि भारताच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते (जन्म: १२ फेब्रुवारी १८७१)
१९६४ : गोपाळ विनायक भोंडे - नकलाकार
१९९३ : दिव्या भारती हिन्दी, तामिळ आणि तेलगु चित्रपट अभिनेत्री (जन्म: २५ फेब्रुवारी १९७४)
१९९६ : भालचंद्र नीळकंठ तथा बाबा पटवर्धन - बालगंधर्वांना पंधरा वर्षे साथ करणारे ऑर्गनवादक.
१९९८ : रुही बेर्डे - चित्रपट व नाट्य अभिनेत्री.
२००२ : मनोहर राजाराम तथा मनू छाबरिया - दुबईस्थित वादग्रस्त भारतीय उद्योगपती, जम्बो ग्रुपचे संचालक.

# क्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरताना अशी काळजी घ्या



शेतीसाठी क्षारयुक्त पाण्याचा वापर करतांना प्रत्येक पाळीच्या वेळी पाण्यावाटे जमिनीत क्षार टाकले जातात. जमिनीस दिलेले पाणी बाष्पीभवनाद्वारे निघून जाते. जमिनीचा निचरा बरोबर नसल्यास हे क्षार जमिनीच्या बाहेर किंवा जमिनित खोलवर जाऊ शकत नाही. अशा रीतीने जमिनीच्या वरच्या थरात क्षारांचे प्रमाण वाढत जाते आणि जमिनी क्षारयुक्त बनतात. क्षारयुक्त पाण्यात सोडियमचे प्रमाण जास्त असल्यास आणि पिकाखालील जमिनीत चुन्याचे प्रमाण कमी असल्यास जमिनी चोपण बनतात, म्हणजे त्या जमिनीतील सोडीयमचे प्रमाण वाढून तिचे प्राकृतिक गुणधर्म बिघडतात. त्यामुळे जमिनीचा सामू वाढून तिच्यातील अन्नद्रव्यांची उपलब्धतता कमी होते. आणि जमिनीची उत्पादनक्षमता खालावते. क्षारयुक्त आणि चोपण जमिनीची सुधारणा करतांना फार खर्च येतो आणि बराच कालावधी लागतो. त्यामुळे क्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरतांना काळजी घ्यायला पाहिजे. आणि त्यासाठी पाण्याची प्रत माहिती करून घेणे आवश्यक आहे.

क्षारास प्रतिकार करणारी पिके : कापूस, ताग, धौचा, शुगरबीट, ओट, पालक, घास, खजूर, बार्ली, नारळ, पेरू, निलगिरी, चिकू

मध्यम प्रतिकार करणारी पिके : गहू, ज्वारी, बाजरी, मका, ऊस, सूर्यफुल, सोयाबीन, भुईमुग, अंजीर, बोर, डाळिंब, पपई, द्राक्ष, कलिंगड, आंबा, केळी, टोमॅटो, गाजर, काकडी, भोपळा, कांदा, बटाटा, लसूण.

क्षारयुक्त पाण्याचा वापर करतांना घ्यावयाची काळजी : जमिनीला साधारणतः उतारा द्या. उताराच्या दिशेने खोल नांगरट करा. शेतात उताराच्या दिशेने योग्य मशागत करा. पिकाची लागवड सरीच्या बगलेत करा. पिकांमध्ये नियमित वेळोवेळी उताराच्या दिशेने आंतरमशागत करा. सेंद्रीय खतांचा तसेच हिरवळीच्या खतांचा जास्त प्रमाणात वापर करा. रासायनिक खतांमध्ये नत्रयुक्त खतांचा शिफारशीपेक्षा २५ टक्के जास्त वापर करा. सरीमध्ये पाचटांसारखे आच्छादन टाका. पिकांना वारंवार परंतु मर्यादित पाणी द्या. पाण्याचे पाणी उपलब्ध असल्यास खारवट पाण्यात ते ठराविक प्रमाणत मिसळू द्या. एक आड एक सरी भिजवा. ठिबक सिंचन वापर, विद्राव्य क्षारांची मात्रा २ डेसीसायमन प्रति मीटरपेक्षा कमी असल्यास करावा. क्षार सहनशील पिकांची निवड करावी. उदा. गहू, ज्वारी, ऊस, मका. सूर्यफुल, कापूस, शुगरबीट, ई. पाणी जास्त क्षारयुक्त असेल तर निलगिरी, बांबू, सुबाभूळ इत्यादिंची वृक्षशेती करावी.

पाणी तपासणीसाठी नमुना कोठे पाठवाल? : महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातर्फे,प्रत्येक जिल्ह्यात मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा अस्तित्वात आहेत,तसेच राज्यातील चारही कृषि विद्यापीठाच्या कार्य क्षेत्रातील काही संशोधन केंद्रांवर तसेच राज्यातील काही कृषि विज्ञान केंद्रे;साखर कारखाने; खाजगी खत कंपन्या येथे मातीपाणी परिक्षणाची सुविधा शुल्कासह केली जाते.

# निवडणुकीच्या काळात साखर आणि गहू महागणार का? सरकारचा प्लान काय ?

सध्या देशात लोकसभेचं बिगुल वाजलं आहे. यामुळं देशासह राज्यातील राजकीय वातावरण गरम झालं आहे. सर्वच राजकीय पक्षांनी प्रचाराला सुरुवात केलीय. अशातच या निवडणुकांच्या काळात कोणत्याही वस्तूंचे दर वाढू नये म्हणून सरकार विशेष खबरदारी घेताना दिसत आहे. महागाई वाढू नये आणि सर्वसामान्य जनतेला फटका बसू नये असा सरकारचा प्रयत्न आहे. दरम्यान, या निवडणुकीच्या काळात साखर () आणि गव्हाच्या किंमतीत देखील वाढ होणार नाही. याबाबत सरकारनं उपायोजना केल्या आहेत.

दर नियंत्रणासाठी सरकारचे प्रयत्न

निवडणुकीच्या काळात सर्वसामान्य जनतेला महागाईचा फटका बसू नये म्हणून सरकार प्रयत्न करत आहे. जेणेकरुन सर्वसामान्य जनतेच्या मताचा फटका बसणार नाही याची दक्षता सत्ताधारी घेतायेत. सध्या साखर आणि गव्हाच्या दरात वाढ होणार असल्याचं बोललं जात आहे. मात्र या दोन्हीच्या दरात वाढ होणार नाही. कारण सरकार दर नियंत्रीत ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहे. यासाठी विविध धोरणं आखत आहे.


गहू आणि साखरेचा साठा जाहीर करण्याच्या सरकारच्या सूचना : निवडणुकीच्या काळात साखर आणि गव्हाचे दर वाढू नयेत म्हणून सरकारनं कृषी कंपन्या आणि व्यापाऱ्यांवर पाळत ठेवली आहे. कोणत्याही प्रकारचा साठा व्यापाऱ्यांना करता येणार नाही. सरकारनं व्यापाऱ्यांसह कंपन्यांना गहू आणि साखरेचा कोटा जाहीर करण्यास सांगितले आहे. तर काही साखर कारखान्यांना प्रमाणापेक्षा जास्त साखरेची विक्री केल्यामुळं त्यांच्या साखर विक्रीच्या कोट्यात २५ टक्क्यांची कपात करण्यात आलीय. याचा मोठा फटका साखर कारखानदारांना बसलाय.

कांद्यावर निर्यातबंदी

सरकार देशांतर्गत बाजारात शेतमालाच्या किंमती वाढू नये म्हणून विविध धोरणं आखत आहे. यातीलच एक धोरण म्हणजे कांदा निर्यातबंदी. कांद्याचे वाढत जाणारे दर कमी करण्यासाठी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. या बंदीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. ४००० रुपयांवर गेलेला कांद्याचा दर हा ८०० ते १२०० रुपयांवर आला आहे. अचानक एवढी दरात घसरण झाल्यामुळं शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लागली आहे. कांद्यासह गहू, तांदूळ यावर देखील निर्यातबंदी लागू करण्याचा निर्णय सरकारनं घेतला होता. यामुळं किमंती नियंत्रीत राहत आहे. मात्र, दुसरीकडे शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे.



# या महिन्यातच करा ज्वारी, बाजरी आणि मकाची लागवड!



भरपूर व उत्कृष्ट प्रतिचा चारा सातत्याने मिळण्यासाठी धान्य पिका प्रमाणेच चारा पीक लागवडीचे नियोजन करणे गरजेचे असते. सध्या महाराष्ट्रात चारा टंचाई मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली आहे. मार्च, एप्रिल महिन्यात ज्वारी, बाजरी आणि मका या चारा पिकांची लागवड केली जाते. जाणून घेऊ या पिकांच्या लागवडीविषयी माहिती.

जमीन : ज्वारी पिकासाठी मध्यम, बाजरी साठी हलकी ते मध्यम व मका पिकासाठी मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी.

सुधारित वाण : ज्वारी : रुचीरा आर-४-११, मालदांडी ३५-१, निळवा, एमपी चारी, पुसा चारी, आय एस ४७७६, एएसजी १४, एमकेव्ही चारी.

बाजरी : जाएन्ट बाजरा, गराजको. मका : आफ्रीकन टॉल, मांजरी, कंपोझीट विजय, गंगासफेद डेक्कन हायब्रीड.

बियाणे : ज्वारी - प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे

बाजरी - प्रति हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे

मका - प्रति हेक्टरी ४० ते ४५ किलो बियाणे वापरावे

लागवड पद्धत आणि पेरणीचे अंतर : ज्वारी, बाजरी आणि मका या तिन्ही पिकांची लागवड पाभरीने पेरणी करून करावी. लागवडीसाठी ३० ४५ सें. मी. अंतर ठेवावे.

खते प्रति हेक्टरी : ज्वारी, बाजरी आणि मका पिकांसाठी २५३० टन कंपोस्ट, नत्र ८० किलो, स्फुरद ४० किलो व पालाश ४० किलो याप्रमाणात खते द्यावी.

पाणी व्यवस्थापन : या पिकांना इतर हंगामात पाणी देणे गरजेचे असते. परंतु उन्हाळ्यात ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

उत्पादन : योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति हेक्टरी ज्वारीचे ४० ते ४५ टन, बाजरीचे ३५ ते ४० टन आणि मक्याचे ४५ ते ५० टन उत्पादन मिळू शकते.

# भदावरी म्हैस दुधासाठी अधिक उपयुक्त

राज्यासह देशामध्ये ग्रामीण भागात दूध व्यवसायामुळे शेतकऱ्यांची चांगली भरभराट झाली आहे. शेतकरी प्रामुख्याने त्या-त्या भागात, संबंधित वातावरणानुसार म्हशींच्या जातींचे पालन करताना दिसतात. देशात म्हशींच्या अनेक जाती आहेत. त्यातीलच एक जात म्हणजे भदावरी म्हैस होय. या म्हशीची विशेषतः म्हणजे तिच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात फॅट असते. ज्यामुळे अधिकचा दर मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडून या जातीच्या म्हशीला विशेष मागणी असते. या जातीच्या म्हशीच्या दुधामध्ये जवळपास १४ ते १८ टक्क्यांपर्यंत फॅट असते. ज्यामुळे ती इतर जातींपेक्षा वेगळी ठरते.

भदावरी म्हशीचे मूळस्थान : भदावरी जातीची म्हैस ही प्रामुख्याने आग्रा, इटावा, मुरैना, ग्वालियर या उत्तर-मध्य भारतातील जिल्ह्यांमध्ये आढळते. या सर्व जिल्ह्यांच्या भागाला पूर्वी 'भदावर' नावाने ओळखले जात होते. ज्यामुळे या म्हशीचे नाव 'भदावरी म्हैस' असे पडले. या प्रजातीची म्हैस ही प्रामुख्याने लालसर तपकिरी रंगाची असते. तर तिचा बांधा हा मध्यम आकाराचा असतो. पुढील बाजूने ही म्हैस बारीक तर मागील बाजूने काहीशी फुगीर असते. या म्हशीची शिंगे ही सपाट, जाड व मागे तसेच आतील बाजूस वळलेली असतात. या प्रजातीच्या रेड्याचे वजन हे ४०० ते ५०० किलो तर म्हशीचे वजन हे ३५० ते ४०० किलो इतके असते.



किती दूध देते? ; भदावरी जातीची म्हैस ही दररोज ६ ते ८ लिटर दूध देण्यास सक्षम आहे. भदावरी म्हैस ही मुऱ्हा म्हशीपेक्षा कमी दूध देते. मात्र, ती तूप निर्मितीसाठी सरस ठरते. विशेष म्हणजे जगातील कोणत्याही म्हशीच्या दुधात इतक्या मोठ्या प्रमाणात फॅट नसते. या म्हशीच्या दुधामध्ये सर्वाधिक १४ ते १८ टक्के फॅट आढळते. तसेच ही म्हैस आपल्या एकूण प्रजननकाळात सरासरी १३००-१५०० लिटर दूध देण्यास सक्षम मानली जाते.

किती आहे किंमत? : भदावरी म्हशीच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात फॅट असल्याने, आता अनेक शेतकऱ्यांच्या मनात ही म्हैस खरेदी करण्याचा विचार मनात आला असेल. तसेच या म्हशीची किंमत किती असेल. हा विचार देखील शेतकऱ्यांचा मनात आला असेल. तर ही म्हैस प्रामुख्याने शेतकऱ्यांना ६० ते ७० हजारांपर्यंत मिळू शकते. शेतकऱ्यांनी शक्यतो कोणत्याही ऑनलाईन प्रलोभनांना बळी न पडता, सुरक्षित मार्गाने जनावरांची खरेदी करावी.

काय आहेत 'या' म्हशीची वैशिष्ट्ये : भदावरी प्रजातीच्या म्हशीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही म्हैस कोणत्याही प्रकारच्या वातावरणात जुळवून घेते. ज्यामुळे देशातील प्रत्येक राज्यामध्ये ही म्हैस पाळणे सहजशक्य आहे. दूध उत्पादकांना म्हशीच्या दुधाला अधिक फॅट मिळवून, दुग्ध व्यवसायात आर्थिक भरभराट करून घ्यायची असेल. तर त्यांच्यासाठी ही म्हैस उत्तम पर्याय ठरणार आहे. या प्रजातीच्या म्हशीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिला तुलनेने कमी चारा लागतो. असे असूनही ती गुणवत्तापूर्ण दूध देण्यास महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे या म्हशीच्या चाऱ्यावर शेतकऱ्यांचा खर्च कमी होतो. याशिवाय या प्रजातीच्या म्हशीची रोगप्रतिकारशक्ती उत्तम असते. तसेच ती अत्यंत कठीण परिस्थितीतही तग धरून राहते.

cmyk



# शिवछत्र परिवाराच्या रोजा इफ्तार पार्टीला उत्स्फुर्त प्रतिसाद

## अमरसिंह पंडित, विजयसिंह पंडित व शिवछत्र परिवाराकडून मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा

गेवराई । प्रतिनिधी

पवित्र रमजान निमित्ताने दरवर्षीप्रमाणे माजीमंत्री शिवाजीराव पंडित कुटूंबिय तथा शिवछत्र परिवाराच्यावतीने गेवराई येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी इतर समाज बांधवांनी उपस्थित राहून मुस्लिम समाज बांधवांना रमजान निमित्त शुभेच्छा दिल्या. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, रणवीर पंडित व पृथ्वीराज पंडित यांनी याप्रसंगी सर्वांचे स्वागत करून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

सालाबादाप्रमाणे माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबियांच्यावतीने मंगळवार, दि.३ एप्रिल रोजी सायंकाळी गेवराई शहरात आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला मोठ्या प्रमाणावर उपस्थित दर्शवून मुस्लिम समाज बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पवित्र रमजानच्या निमित्ताने हिंदु-मुस्लिम समाजातील ऐक्य व सद्भावना यावेळी दिसून आली. एकमेकांची गळाभेट घेत अनेकांनी आनंदी वातावरणात



शुभेच्छांचा वर्षाव केला. रोजा इफ्तार पार्टीचे आयोजक जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, रणवीर पंडित, पृथ्वीराज पंडित यांच्यासह शिवछत्र परिवारातील सर्व सदस्यांनी उपस्थितांचे स्वागत केले. रोजा इफ्तार पार्टीला गेवराई शहरातील मुस्लिम समाज बांधवांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देवून आनंदी वातावरणात शुभेच्छांची देवाण घेवाण केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.एस.एस.पटेल, माजी पं.स.सदस्य तय्यबभाई, भवानी अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष मोहम्मद गौस, हन्नानसेठ, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, अल्पसंख्यांक सेलचे सय्यद समीर, तलवाड्याचे उपसरपंच अज्जूसेठ सौदागर, माजी नगरसेवक सय्यद नजीब, सय्यद एजाज, गुफरान इनामदार, शेख मिनहाज, सलीम शेख, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष खालेद कुरेशी, सरवर खान, जावेद इनामदार, शेख समशेर, रहीमभाई, जे.के. बाबुभाई, नवीद मशायक, नय्युम कुरेशी, आवेजसेठ, सैजान इनामदार, शेख मोहसीन, मकसुद टेलर, शम्मूभाई पठाण, ताहेर पठाण, बाबुभाई, मतीनसेठ, आबेदसेठ, इसाकभाई, रज्जाकभाई, युनूस मिस्त्री, याहीया चाऊस, कौंदनसेठ, आरपीआयचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, माजी सभापती जगनपाटील काळे, उपसभापती विकास सानप, जालिंदर पिसाळ, दत्ता दाभाडे, शारेकभाई, तारेकसेठ, अक्षय पवार, अमित वैद्य, उत्तम सोलाने, सय्यद मुस्तफा, जीवन साळवे, रविकांत नवपुते यांच्यासह मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

# प्रा.ईश्वर मुंडे रूई धारूर येथील कुस्त्यांच्या फडात

धारूर /प्रतिनिधी

तालुक्यांतील महत्त्वाच्या व मोठ्या यात्रांत रूई धारूर येथील श्री राणोबा देवस्थान यात्रेचे नाव आसते. ही यात्रा मागील चाळीस वर्षापासून भरते.देवाच्या गाडया ओढणे,शोभेची दारू उडवणे,सांस्कृतीक मनोरंजन कार्यक्रमांसह कुस्त्यांची मोठी दंगल होते. या वर्षी नटराज कला केंद्र,जामखेड यांचा सांस्कृतीक कार्यक्रम झाला व रू.१ ते रू.२००० पर्यंतच्या कुस्त्या पैलवान फडात फिरवून लावल्या व नंतर रू.२००० ते रू. १०,००० च्या कुस्त्या पैलवानांच्या नियोजित जोड्या लावून लावल्या.जिंकलेल्या पैलवानास ८० % रक्कम व हारलेल्या पैलवानास २०% रक्कम देण्यात आली.

बीड लोकसभेच्या निवडणूकीची रणधुमाळी चालू आसतांना बीड लोकसभा निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाकडून ईच्छूक संभाव्य उमेदवार प्रा.ईश्वर सुभद्रा आनंदराव मुंडे यांनी गावकऱ्यांच्या निमंत्रणावरून कुस्त्यांच्या फडात हजेरी लावली. या वेळी गावकऱ्यांनी प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांचे भव्य स्वागत केले. रूई धारूर हे पैलवानांचे गाव



आहे.पैलवानांना प्रेरणा मिळावी व आपल्या मातीतील कुस्ती खेळ वाढावा असे मनोगत व्यक्त करून प्रा.ईश्वर मुंडे सर यांनी कुस्त्यांसाठी देणगी रक्कम देवून पैलवानांना बक्षिसे ही दिले. या कुस्त्यांच्या कार्यक्रमांस भाजप चे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी ही उपस्थीती लावून देणगी रक्कम दिली. यात्रा उत्सव यशस्वी करण्यासाठी जेष्ठ नेते शिवाजी तिडके,सरपंच विजय राठोड,उप सरपंच बालासाहेब सोळंके, रामदास काकडे गुरुजी, सदाशिव थोरात गुरूजी, पै.राम तिडके, पै.राजू मुंडे, पै.अतूल सोळंके, बालासाहेब थोरात, डॉ.बालासाहेब तिडके, डॉ.शिवदास तिडके, बाबुराव तिडके गुरूजी, अविनाश भैया तिडके, बाबूराव वाघमारे,अमोल तिडके, रामेश्वर तिडके, उध्दव तिडके, सचिन तिडके, गजानन तिडके यांच्या सह सर्व गावकऱ्यांनी यात्रा उत्सव व कुस्त्यांचे सुंदर नियोजन केले होते. सोलापूर येथील पै.दिनेश गवळी यांनी उत्तम निवेदन केले तर बाळासाहेब गायकवाड यांनी उत्कृष्ठ फोटोग्राफी केली. या वेळी सेवा निवृत्त तलाठी अनिल जोशी, आशोक नाना सोळंके, केशव वाघमारे यांचे सह रूई गाव व परिसरातील मान्यवर,कुस्ती प्रेमी व राणोबा भक्त उपस्थीत होते.

# रमज़ान परिचय व रोज़ा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात रमज़ान परिचय व रोज़ा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार दिनांक ५ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ०५:३० वाजता आयोजित करण्यात आला असून महिलांसाठी बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

पवित्र रमज़ान महिन्याच्या शुभ मुहूर्तावर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने बीड शहरातील दोन्ही समाजातर्फे रोज़ा इफ्तार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ज्यामध्ये सर्व समाजातील लोकांना आमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील प्रसिद्ध इस्लामी विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक, जमाअत ए इस्लामी हिंद महाराष्ट्रच्या सदिच्छा विभागाचे सचिव डॉ. सय्यद रफिक पारनेरकर यांचे रमज़ान परिचय या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. ज्यामध्ये रमज़ान, उपवासाचा उद्देश, कुरआनचा संदेश मराठी भाषेतील महत्त्वाची माहिती देण्यात येणार आहे. व्याख्यानानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनच्या मैदानात रोज़ा इफ्तार कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व समाजातील बंधू-भगिनींनी आपला मौल्यवान वेळ काढून या विशेष कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड, सावित्री-फातेमा सद्भावना मंच जमाअत ए इस्लामी हिंद बीड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मित्र मंडळ बीडकडून करण्यात आले असून महिलांसाठी बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

# बीड मध्ये होणार आंतरराष्ट्रीय स्तरावरील रग्बीचे प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर

बीड । प्रतिनिधी

मागील दहा वर्षापासून बीड येथे, बीड जिल्हा रग्बी असोसिएशन मार्फत रग्बी हा खेळ शहरी आणि ग्रामीण भागात रुजवण्याचा प्रयत्न संघटनेमार्फत केला जातो. आज पर्यंत १ आंतरराष्ट्रीय खेळाडू, २३ राष्ट्रीय खेळाडू, ९ राज्यस्तरीय प्राविण्य प्राप्त संघ (पदक विजेते) आणि शेकडो राज्यस्तरीय खेळाडू या खेळाने बीड क्रीडा क्षेत्राला दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून बीडमध्ये अजून हा खेळ रुजवावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर दिनांक ५ ते ७ एप्रिल पर्यंत मोरया क्रीडा मंडळ कॅनल रोड, पत्रकार भवन समोर, आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात जागतिक रग्बी संघटनेने ठरवून दिलेल्या नियमानुसार खेळ कसा शिकवला जावा,प्रशिक्षन कसे द्यावे,प्रशिक्षक कसे निर्माण करावेत यासाठी ऑनलाईन, ऑफलाईन तसेच प्रॅक्टिकली सर्व ज्ञान देण्यासाठी जागतिक रग्बी संघटनेचे एज्युकेटर शेरझाद रबाडी हे स्वतः बीड येथे येणार आहेत.

या प्रशिक्षण शिबिरात जागतिक रग्बी संघटनेचे ठरवून दिलेला अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करून ऑनलाईन पद्धतीने परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षकासच या प्रशिक्षण शिबिरात पात्र ठरवण्यात येते.. बीड मधील २० प्रशिक्षणार्थी या शिबिरास पात्र ठरले आहेत. सदरील प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर महाराष्ट्र रग्बी असोसिएशन आणि बीड रग्बी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. राज्य संघटनेचे सचिव नासिर हुसेन, महाराष्ट्राचे प्रमुख प्रशिक्षक मीनल पास्ताला, ईश्वर कोटारकी आणि जिल्हा संघटनेचे अध्यक्ष इसाक भाई शेख, सचिव महेश घुले, उपाध्यक्ष रमेश सानप,कोषाध्यक्ष हरिभाऊ बांगर, कार्याध्यक्ष नितीन येळवे,अशोक चौरे आणि शोएब खाटीक कारागृह पोलीस यांच्या प्रयत्नातून सदरील प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर यशस्वीपणे पूर्ण होत आहे.

# पूर्णवादी बँकेच्या नफ्यात ४८ % ने वाढ

बीड । प्रतिनिधी

पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म., बीड ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य बैंक असून गतवर्षाच्या तुलनेत २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात बँकेच्या नेट नफ्यात ४८% ने वाढ होऊन बँकेला रू. ७ कोटी ५८ लक्ष एवढा भरघोस नफा झालेला आहे. दि. ३१.०३.२०२४ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाअखेर बँकेच्या एकुण ठेवी रू. ८११.५५ कोटी एवढ्या असून कर्जे रू. ५१५.६५ कोटीची आहेत. बँकेचे भागभांडवल रू. २७.९२ कोटी असून बँकेची नेटवर्थ रू. ६६.०८ कोटी एवढी आहे तर बँकेच्या नेट चे प्रमाण केवळ १.६२% इतके असून बँकेचा १३.७५% असल्याची माहिती बँकेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेश कुलकर्णी यांनी दिली तसेच त्यांनी सांगितले कि, बँकेच्या या यशात बँकेचे सर्व सन्मानीय सभासद, ग्राहक, संचालक व सर्व कर्मचारी वृंदाचे फार मोठे योगदान आहे. बँकेचे अध्यक्ष डॉ. अरुण निरंतर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली तसेच उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांचे साथीने बँकेने सर्व आघाडींवर प्रगती साधून ग्राहकांचा बँकेवरील विश्वास अभेद्य ठेवला आहे.

# लिंबागणेश येथील मारोती मंदिरातील मुर्तीची अज्ञाताकडून तोडफोड

लिंबागणेश

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मध्यवर्ती असलेल्या मारोती मंदिरातील हनुमानाच्या मुर्तीची तोडफोड केल्याचे दररोज सकाळी पुजा अर्चा करण्यासाठी गेलेल्या भाविकांच्या निदर्शनास आले.दगडीमुर्ती असलेल्या शेंदुरयुक्त मुर्तीची तोडफोड करण्यात आल्याचे आढळून आले.

डॉ.गणेश ढवळे यांनी नेकनुर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांना याविषयी कल्पना दिल्यानंतर पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस उपनिरीक्षक नितिन गुट्टुवार,लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे.संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मारोतीच्या मंदिरात ग्रामस्थांची



बैठक घेऊन घटनेविषयी ग्रामस्थांशी संवाद साधत शांततेचे आवाहन करत चौकशी करून संबंधित प्रकरणांतील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी, विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी,राजेभाऊ जाधव, नितीन जाधव, रामदास मुळे,विनायक वाणी, रामदास मुळे , महादेव कुदळे,उमेश जोगदंड, गणपत घोलप, सुखदेव वाणी,कचरू निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे उपस्थित होते.

# अंबाजोगाई शहरात विठ्ठल रुक्मिणी व संत सावता महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलशारोहण सोहळा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री विठ्ठल रुक्मिणी व संत श्री सावता महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलशा रोहण सोहळ्या निमित्य अंबाजोगाई शहरातील संत सावता माळी चौक या ठिकाणी दि २ एप्रिल ते ६ एप्रिल या कालावधी मध्ये ह.भ.प.बाळू महाराज उखळीकर भागवताचार्य यांच्या सुश्राव्य वाणी मधून श्री. शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आसुन आज सकाळी ९ वाजता श्री गुरू चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये हा प्राणप्रतिष्ठा संपन्न होणार आहे. वै.ह.भ.प.गुरूवर्य माऊली दादा चाकरवाडीकर व वै.ह.भ.प.गुरूवर्य माधवबुवा शास्त्री यांच्या कृपा आशीर्वादाने व ह भ प अच्युत महाराज जोशी यांच्या मार्गदर्शना खाली संत सावतामाळी चौक, माळी नगर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीविठ्ठल रुक्मिणी, संत श्रीसावतामहाराज प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा तथा श्री. शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ कार्यक्रमा निमित्य ह.भ.प.बाळू महाराज उखळीकर भागवताचार्य, ह.भ.प.प्रा. शाम महाराज नेरकर श्रीक्षेत्र परळी वै., ह.भ.प. जगन्नाथ महाराज देशमुख पंढरपुर (विश्व वारकरी संघ अध्यक्ष), ह.भ.प. श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प. ज्ञानेश भक्त अर्जुन महाराज लाड गुरूजी यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्याची सांगता दि.०६/०४/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता ह भ. प. गुरुवर्य केशव महाराज उखळीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार आहे. त्या नंतर महाप्रसादाचा लाभ भाविक भक्तांना होणार आहे.

आज सकाळी ९ वाजता श्री गुरू चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या हस्ते व ह.भ.प. सुभाष राधाकिसन कुलकर्णी, ह.भ.प. उदयकुमार कुलकर्णी, ह.भ.प. कृष्णा भालचंद्र ववेकर, ह.भ.प. बालासाहेब कुलकर्णी, ह.भ.प. शेषेराव पांडव, ह.भ.प. मंगेश खडके या पूरोहितांच्या सह मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये श्रीविठ्ठल रुक्मिणी व संत श्री सावता महाराज प्राणप्रतिष्ठा संपन्न होणार आसून या सोहळ्या निमित्य असंख्य मान्यवर उपस्थित राहणार असुन ह भ प अमोल महाराज घोडके, ह भ प विनोद महाराज निकम, अंबादास चिक्षे, विष्णू महाराज इरळे, प्रकाश बोरगावकर, डॉ नाथराव घरजाळे, पद्ममाकर महामुनी, दिलीपराव भांगडे, कचरू नाना जगताप, संजय अंकुलवार, हिंदू लाल साखरे, दशरथ कदम,ज्ञानोबा डोंगरे, हरिदास बामणे,दत्ता महाराज शेप, बाबुराव आप्पा चाटेयोगेश करपुडे, आकाश सोमवंशी पाटील, अनंत आंबेकर बप्पा,सुजित महाराज शिंदे, व्यंकटेश दिंडोरे, रमेश रुद्राक्ष, बालाजी माले, अर्चनाताई शेटे, नीलकंठ कीर्तन सेवा यांच्या पुढाकाराने संपन्न होणारा हा सोहळा संपन्न करण्यासाठी नवकिरण गणेश मंडळ, संगम गणेश मंडळ, श्री संत गजानन भक्त मंडळाचे कार्यकर्ते विशेष परिश्रम घेत आहेत.

# स्वरुपाच्या शोधात राहतो तो साधक- राम महाराज डोंगर

## एकनाथ महाराजांच्या समाधी सोहळ्याची सांगता

बीड । प्रतिनिधी

मानवी जीवनात माणसे सुखाच्या शोधात राहतात पण ज्यातून दुःख ,तृष्णा मिळेल हेच कर्म केले जाते. खरे सुख कशात आहे हे शोधत नाहीत. आपले स्वरूप शोधले तर त्यात परम कल्याण आहे. स्वरूप म्हणजे आनंद, अद्वैत आहे. हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे व त्याच्या शोधातील माणसांना साधक म्हणतात. म्हणून स्वरूपाच्या शोधात राहतो तो साधक आहे असे प्रतिपादन वेदांताचार्य हरिभक्ति परायण राम महाराज डोंगर जाट नांदूर यांनी पैठण येथे काल्याच्या किर्तन प्रसंगी केले.

श्रीक्षेत्र पैठण येथे गोदावरीच्या तटावर शांतिब्रह्म एकनाथ महाराज यांच्या ४२५ व्या जलसमाधी सोहळ्यानिमित्त बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र ज्ञानेश्वर आश्रम दगडवाडी बीड जिल्हा यांच्या वार्षिक नियमाप्रमाणे दिंडी सोहळ्यात दिंडी चालक हरिभक्ति परायण वैराग्यमूर्ती नारायण महाराज डिसले यांच्या आयोजनातून बहु बरा बहु बरा / या सांगाते मिळे चारा //१//या संत तुकाराम महाराज यांच्या काला प्रकरणातील अभंगातून वेदांताचार्य हरिभक्तिपरायण राम महाराज डोंगर हे भगवंताच्या स्वरूप लक्षणाविषयी सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलतांना हरिभक्ति परायण राम महाराज डोंगर म्हणाले की, आपले आराध्य दैवत भगवान परमात्मा पांडुरंग



आहे. त्याच्या स्वरूप लक्षणाने परमात्मा हा व्यापक, नित्य, आनंदस्वरूप असा आहे .याच्या प्राप्तीसाठी साधकाने मी कोण आहे ? मी कुठून आलो ? माझे कर्तव्य काय आहे ? जगत काय ! कर्ता कोण ? हे कळावे. शास्त्र विचार करून आचरण केल्यास आपला विकास होईल. मोक्ष म्हणजे मोकळ होणे. संसारात माणसे मोकळे होत नाहीत कारण त्यांचे संसारात राहिलेले असते. त्यात ते गुंतून राहतात .मोक्षाकरिता आपण आपले काम, क्रोधादिक विकार घालवावेत. मोक्षासाठी पूर्वपुण्य आवश्यक असून, वैराग्याने ब्रह्मज्ञान होते व त्यानंतर मोक्ष मिळतो. इहलोक व परलोक मनात आणू नयेत. जगत हे जगत न दिसता ते ब्रह्म स्वरूप दिसावे. विषय स्वरूप दिसू नये. ब्रह्मज्ञानी हे परोक्ष ज्ञान आहे. संत हे अपरोक्ष ब्रह्मज्ञान याचे ज्ञान ते करून देतात. तो कसा तर बहुबरा बहुबरा/म्हटले आहे. संतांच्या संगतीत शोधून वाईट गुण मिळत नाहीत. त्यांच्या संगतीत जे पाहिजे तेच म्हणजे आत्मसंगती असते. जगत ,जीव ,परमार्थ, आत्मा बद्दल नेहमी चर्चा करावी. संत हे त्यांना मिळालेला ब्रह्मानंद ते स्वतः घेतात व इतरांनाही वाटतात .आपण परमात्मा स्वरूप होणे म्हणजेच काला आहे.

यासाठी साधकाने फक्त चालावे. पळू व उधळू नये .साधनेत राहून आपल्या स्वरूपात विलीन व्हावे असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी हरिभक्ति परायण नारायण महाराज डिसले महंत संत ज्ञानेश्वर आश्रम दगडवाडी, शिवानंद महाराज येवले ,रामहरि रसाळ गुरुजी विभागीय प्रवक्ता ,व अनंत घीगे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अखिल भारतीय वारकरी मंडळ, डॉक्टर भाऊसाहेब महाराज नेटके संत पीठ पैठण, डॉक्टर अरुण महाराज वाळके, डॉक्टर सुभाष महाराज खेत्रे, मृदंग मणी म्हणून कृष्णा महाराज खोले, गोरख महाराज कोकाटे, पांडुरंग महाराज खोपडे बीड तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

# प्लास्टिक व कॉस्मेटिक शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ बीड व विठाई हॉस्पिटल बीड द्वारा आज शुक्रवार दि.०५ एप्रिल २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगरचे प्लास्टिक सर्जन तज्ञ डॉ. अमित पाटील यांच्या कडून तपासणी व शस्त्रक्रिया करण्यात येईल, या शिबिरामध्ये जन्मता असलेले व्यंग, हाता-पायावरील जुनाट जखमा, कॉस्मेटिक सर्जरी, नाक सरळ करणे, त्वचेवरील डाग व्रण, हेअर ट्रान्सप्लांट मार्गदर्शन व तपासणी व दुभांगलेले ओठ सरळ करणे. या शिबाराची वेळ सकाळी ९ वेळ ते संध्याकाळी ६ पर्यंत राहील. आवश्यक असलेल्या रुग्णांना महाराष्ट्र शासन द्वारा महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य सेवा अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया करण्यात येईल.

तरी रुग्णांनी नाव नोंदणी विठाई हॉस्पिटल जिरेवाडी, बीड मो. ८३०८८ ०४४१२ येथे करावी. सर्व गरजू रुग्णांना आवाहन आहे कि त्यांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.कृष्णा खांडे, सचिव रो.संकेत कदम, विठाई हॉस्पिटलचे तज्ञ डॉ. श्रीहरी लहाने व डॉ. अमोल लहाने, शिबिर प्रमुख रो.सुरज लाहोटी मो. ९८२२३ ९००२४, प्रोजेक्ट चेअरमन रो.प्रमोद निनाळ मो. ९४२२२ ४००५८, रो.डॉ. आर. बी. घोडके, मेडिकल कमेटी चेअरमन रो.राम मोटवानी, रो.विलास बडगे, रो.सुकेश राव, रो.कमलेश मुंदडा, रो.संदीप खोड, रो.अक्षय शेटे, रो.ओमप्रकाश लोहिया, रो.वाय.जनार्धन राव, रो.अभय कोटेचा, रो.रत्नाकर क्षीरसागर, रो.डॉ. अनिल सानप, रो.डॉ. संतोष शिंदे, रो.डॉ. सचिन वारे, रो.अभिनंदन कांकरिया, रो.दिपक समदरिया, रो.विद्याभूषण क्रांति, रो.अनिल जोशी, रो.सुहास बेदरे, रो.तुकाराम वायभट व सर्व सभासद रोटरी क्लब बीड व विठाई हॉस्पिटल सभासदांनी केले आहे.

cmyk

# नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे -आ.पवार

## भाजपा वॉरियर्सची आ.लक्ष्मण पवारांच्या उपस्थितीत गेवराईत बैठक संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत गोरगरीब कल्याणाच्या योजनेंतर्गत देशातील कोट्यावधी गोरगरीबांना लाभ दिलेला आहे तर महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गेवराई विधानसभा मतदारसंघात कोट्यावधीचा निधी आणून मतदारसंघ मोठ्या प्रमाणात विकासाची कामे कामे भाजपा सरकारने केलेली आहे म्हणून येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना निवडून आणण्यासाठी गेवराई मतदार संघातील वॉरियर शक्ती केंद्रप्रमुख बूथ प्रमुख यांना महत्त्वाची भूमिका पार पाडून पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मताने निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी कामाला लागावे असे आव्हान आमदार लक्ष्मण पवार यांनी च्या आयोजित बैठकीत बोलताना केले आहे



भाजपाचे प्रदेश कार्यालयाच्या सूचनेनुसार आज दि.४ मार्च रोजी आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या उपस्थितीत गेवराई भाजपाची बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी लोकसभा विस्तारक बाबासाहेब आगे, मा.नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, ब्रम्हदेव धुरधरे, राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे,दादासाहेब गिरी, याहिया खॉन, मधुकर वादे,ईश्वर पवार, बंडु बारगजे,शरीफभाई, किशोर धोडलकर, भरत गायकवाड, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार लक्ष्मण आण्णा म्हणाले गेल्या दहा वर्षांमध्ये देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या माध्यमातून देशात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकास विकास सुरू आहे महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या माध्यमातून गेवराई मतदार संघासाठी बीड जिल्ह्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळालेला आहे त्याचे काम सध्या मतदारसंघात चालू आहे त्यामुळे चालू असलेल्या विकासाचा अश्वमेध सुरू ठेवण्यासाठी लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांना गेवराई मतदार संघातून प्रचंड मताधिक्य मिळवून देण्यासाठी सर्व भाजपा पदाधिकारी आजी माजी नगरसेवक माजी जिल्हा परिषद सदस्य आजी-माजी पंचायत समिती सदस्य शक्ती केंद्रप्रमुख, वारियर्यस,बुथव यांनी कामाला लागावे असे आव्हान आ.लक्ष्मण पवार यांनी केले आहे

बैठकीस विठ्ठल मोटे,अशोक शिंदे, श्रीराम घाटुळ, अशोक वडघाणे,सचिन वावरे,नरेश पवार, सुदर धस,शरद कादगे, लक्ष्मण चव्हाण, सत्यजित जाधव, हनुमान येवले, अशोक घोलप, दिपक वावरे,दिलीप मोरे, बळीभाऊ करे, महादेव चव्हाण, पांडुरंग जगताप, छगन पवार, विलास शिंदे, अभिजित मरकड, गोपाल चव्हाण, गौरव खरात, बाबा खरात, रवि आहेर, महादेव उबाळे, शिवाजी सोलाट,हनुमान निकम,सुदाम डिगरे, नारायण जगताप, रामेश्वर पानखडे, प्रकाश गाडे,बाळासाहेब उबाळे,अशोक राऊत, विक्रम भोसले,प्रशोत्तम दाभाडे, मोहळकर आण्णा,महेश खरात, बाबासाहेब गिते,नईमभाई,अशोक काळे,सुरेश काका लाखे,कृष्णा ढाकणे, बाबा वाघमारे,शेख नसीर, शेख बाबा, गोरख मोटे, रमेश गाडे, रामभाऊ येवले,रावसाहेब काळे, राजाभाऊ हापटे, आदी वॉरीर्यस उपस्थित होते.

# बंडखोर इच्छुकांना गळाला लावण्याचा वंचितचा प्रयत्न

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक मतदारसंघात सुरुवातीपासूनच अनपेक्षित घडामोडी घडत असल्याने, या मतदारसंघातील पुढील चित्र अजूनही अस्पष्टच आहे. महाविकास आघाडीने ऐनवेळी उमेदवार बदलून उमेदवारीची माळ दुस-याच्याच गळ्यात टाकल्याने मविआत काहीसे तणावाचे वातावरण आहे. तर दुसरीकडे महायुतीचा उमेदवार ठरता ठरत नसल्याने, मतदारसंघातील गोंधळ कायम आहे. या सर्व परिस्थितीवर 'वंचित' डोळा ठेवून असून, बंडखोरीच्या तयारीत असलेल्या इच्छुकांना गळाला लावण्याचा वंचितचा प्रयत्न आहे.

महाविकास आघाडीसोबतची बोलणी फिसकटल्यानंतर वंचितचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वतंत्र उमेदवार देण्यास सुरुवात केली आहे. विदर्भात सात उमेदवार घोषित केल्यानंतर, मंगळवारी त्यांनी आणखी पाच उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे.

यामध्ये सर्वाधिक पुणे लोकसभा मतदारसंघातून वसंत मोरे यांचे नाव चर्चिले जात आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मविआसोबत फिसकटल्यानंतर दलित, मराठा उमेदवार देण्याबाबतची घोषणा केली



होती. त्यानुसार त्यांनी पुण्यात मराठा चेहरा म्हणून वसंत मोरे यांच्या नावाची घोषणा केली आहे. हाच प्रयोग नाशिक लोकसभा मतदारसंघातदेखील केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापर्यंत वंचितकडून अनेक मराठा उमेदवारांची नावे चर्चेत आली आहेत. त्यामध्ये विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांचे नावदेखील पुढे आल्याने, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांचे नाव उमेदवारीसाठी आघाडीवर असल्याने, शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांची उमेदवारी धोक्यात आली आहे. परंतु जोपर्यंत नावाची घोषणा होत नाही, तोपर्यंत ते नाशिकच्या जागेवर दावा ठोकून आहेत. दुसरीकडे पत्ता कट केल्यास, पर्याय म्हणून वंचितच्या तिकिटावर लढण्याची त्यांची तयारी असल्याचेही बोलले जात आहे.

# अर्चना पाटील यांचा अजित पवार गटात प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. अर्चना पाटील यांचा मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर उपस्थित होत्या.

अर्चना पाटील यांच्या पक्षप्रवेशानंतर त्यांना धाराशिव लोकसभा मतदारसंघातून महायुतीची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. सुनील तटकरे यांनी आज पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत याबाबतची घोषणा केली.



धाराशिवमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता धाराशिवमध्ये ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर विरुद्ध अर्चना पाटील अशी लढत बघायला मिळणार आहे.

**अर्चना पाटील मोठ्या फरकाने विजयी होतील : तटकरे**

महायुतीच्या जागावाटपात धाराशिवची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देण्यात आलेली आहे. प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार म्हणून अर्चना पाटील या आमच्या लोकसभेच्या उमेदवार आहेत. महायुतीच्या उमेदवाराची एकसंघाने घोषणा ही पहिल्यांदाच होत आहे. याआधी प्रत्येक पक्षाने आपापले उमेदवार जाहीर केले.

पण धाराशिवच्या बाबतीत एक वेगळं चित्र आपल्याला बघायला मिळतंय. त्या मतदारसंघाचे भाजपचे आमदार, शिवसेनेचे आमदार, राष्ट्रवादीचे शिक्षक पदवीधर मतदारसंघाचे आमदार एकत्रितपणाने येऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महायुतीच्या उमेदवारांची घोषणा करणार आहेत. धाराशिवमध्ये अर्चना पाटील मोठ्या फरकाने विजयी होतील'', असं सुनील तटकरे म्हणाले.

**अर्चना पाटील यांची राजकीय कारकीर्द**

अर्चना पाटील या धाराशिव जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा आहेत. लेडीज क्लब या धाराशिव जिल्हा आणि परिसरातील महिलांसाठी काम करणा-या संघटनेच्या त्या अध्यक्ष आहेत. तुळजापूरचे भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या त्या पत्नी आहेत.

# महायुतीचे उमेदवार महादेव जानकर निघाले करोडपती

**परभणी । प्रतिनिधी**

महायुतीच्या वतीने परभणी लोकसभेसाठी रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. रासपचे जानकर यांनी दि. १ एप्रिल रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी झालेल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जानकर यांना फकिराची उपमा दिली होती. परंतु जानकर यांनी दाखल केलेल्या शपथपत्रातून ते फकीर नव्हे तर करोडपती असल्याचे समोर आले आहे.

महादेव जानकर मूळचे पळसवाडी (जिल्हा सातारा) येथील रहिवासी असून त्यांनी वालचंद कॉलेज, सांगली येथून डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगची डिग्री पूर्ण केली आहे. त्यांनी दिलेल्या शपथपत्रात आपला व्यवसाय शेती हा



दर्शवला आहे. त्यांच्या नावावर १८ एकर १४ गुंठे एवढी शेती असून त्यांच्याकडे चल आणि अचल दोन्ही मिळून जवळपास ५ कोटी रुपयांची संपत्ती असल्याची माहिती शपथपत्रात नमूद करण्यात आली आहे.

त्यामुळे उपमुख्यमंत्री फडणवीसांनी फकीर अशी उपमा दिलेल्या जानकर यांच्याकडे कोट्यवधी रुपयांची संपत्ती असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

जानकर यांनी निवडणूक अर्ज भरताना २०२२-२३ चे उत्पन्न ४० लाख १९ हजार ९९० एवढे असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्याकडे चलसंपत्ती १ कोटी २५ लाख, १० हजार ५९८ रुपये एवढी आहे. यामध्ये कॅश इन हॅण्ड २७ हजार ३३० रुपये आहेत. तर स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये ५१ लाख ६६ हजार ७७९ रुपयांची एफडीआर आहे. त्याचबरोबर गोल्ड बॉंड स्कीममध्ये ७९१ ग्रॅम सोन्यात गुंतवणूक केली असून त्याचे मूल्य २९ लाख ९६ हजार ३००८ रुपये एवढे आहे. याशिवाय त्यांनी पीपीएफ खात्यात २०१९-२० साठी दीड लाख रुपये, तर मार्च २०२४ मध्ये २ लाख २५ हजार ८४५ रुपये आहेत. जानकरांकडे २०० ग्रॅम सोन्या-चांदीचे दागिने असून त्याचे बाजारमूल्य १३ लाख ६५ हजार इतके आहे. सर्व अचल संपत्ती १ कोटी २५ लाख १० हजार ५९८ रुपये आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे अचल संपत्ती ३ कोटी ६२ लाख ९९ हजार ७६० रुपये इतक्या किमतीची असल्याचे त्यांनी आपल्या घोषणापत्रात सांगितले आहे. यामध्ये जानकर यांच्याकडे शेतजमीन, रेसिडेन्शिअल प्रॉपर्टी आणि कमर्शियल प्रॉपर्टी याचा समावेश आहे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज नसल्याचे या शपथपत्रात नमूद करण्यात आले आहे.

# संभाजीराजे - संजय मंडलिक भेटीने चर्चांना उधाण

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार शाहू महाराज छत्रपती यांचे सुपुत्र संभाजीराजे छत्रपती व आणि महायुतीचे उमेदवार खासदार संजय मंडलिक आज (दि.४) एकत्र आले. यावेळी हास्य व हस्तांदोलनाने भेट होताच सर्वांच्याच चर्चेचा विषय ठरला. दोन दिग्गजांनी निवडणूक विषयांवर कोणतेही भाष्य न करता अगदी हसतखेळत औपचारिक गप्पा मारल्या. परंतु, या भेटीची जिल्हाभर सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले आहे.

संभाजीराजे व खासदार मंडलिक हे सुनियोजित कार्यक्रमामुळे राधानगरी तालुक्यातील सरवडे येथील गोकुळचे संचालक व बिद्रीचे माजी उपाध्यक्ष लोकनेते स्व. विजयसिंह कृष्णाजी मोरे यांच्या



प्रथम पुण्यस्मरणास अभिवादन करण्यासाठी कार्यकर्त्यांसह आले होते. दरम्यान, हे दोघे अचानक एकमेकांसमोर आले. दोघांनी हस्तांदोलन केले. आणि हस्य करत चर्चा केली. दोघांच्या भेटीत काय चर्चा होते, या उत्सुकतेने कार्यकर्ते व उपस्थितीतांनी त्याचभोवती गर्दी केली. परंतु, त्यांनी मैत्री, घरगुती व स्व. विजयसिंह मोरे यांचे कार्य यावरच गप्पा मारल्या. छत्रपती संभाजीराजे यांनी संजय मंडलिक यांनी कपाळावर लावलेला भंडारा पाहून खुणेद्वारे खुणवताच सर्वच हास्यकल्लोळात दंग झाले. त्यानंतर छायाचित्रकारांना पोझ देत उपस्थितांना नमस्कार करत दोघेही मार्गस्थ झाले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे अनेकांच्या भुवय्या उंचावल्या आहेत.

# पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज लोकसभा जिल्हा प्रचार कार्यालयाचा शुभारंभ

## बीड मतदारसंघातील बुथ प्रमुख, वॉरिअर्स, पदाधिकाऱ्यांचीही होणार बैठक

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीतील भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या हस्ते आज बीड लोकसभा जिल्हा प्रचार कार्यालयाचा शुभारंभ होत आहे. उद्घाटनानंतर बीड मतदारसंघातील बुथ प्रमुख, वॉरिअर्स आणि पदाधिकारी-कार्यकर्त्यांची बैठक त्या घेणार आहेत. यावेळी खा. डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत.



जिल्हा प्रचार कार्यालय शहरातील संचेती बिल्डींग, एम.एस.ई.बी. कार्यालयासमोर, जालना रोड, येथे सुरू करण्यात आले आहे. आज सकाळी १०.३० वा. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते प्रचार कार्यालयाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यावेळी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, शिवसेना नेते अनिल जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे,सचिन मुळूक,रिपाइंचे नेते पप्पू कागदे, रासपचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मातकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजप महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### बीड मतदारसंघाची बैठक

जिल्हा प्रचार कार्यालयाच्या उद्घाटनानंतर पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड मतदार संघातील सर्व बुथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सुपर वॉरियर्स, जिल्हा, तालुका पदाधिकारी, सर्व आघाड्यांचे पदाधिकारी, नगरसेवक, जि.प. सदस्य, सरपंच, उपसरपंच तथा सर्व कार्यकर्त्यांची महत्वपुर्ण बैठक कै. तुकाराम गुरूजीनगर, मस्के कन्स्ट्रक्शन प्लांट, चऱ्हाटा रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध



## सुप्रीम कोर्टाकडून निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

अमरावतीच्या खासदार नवनीत कौर राणा यांच्या अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र बोगस ठरवणा-या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणा-या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत राणांना मोठा दिलासा दिला आहे. नवनीत राणा अमरावती लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून आज उमेदवारी अर्ज भरणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर त्यांचा निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नवनीत राणा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सुप्रीम कोर्टाने जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहे. आता त्यांचा निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र बोगस ठरवले होते. २०१९ मध्ये उमेदवारी अर्ज भरताना बनावट जात प्रमाणपत्र दिल्याचा आरोप राणा यांच्यावर करण्यात आला होता. दरम्यान आज सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहे.

नवनीत राणा भाजपच्या कमळावर अमरावतीतून खासदारकीची निवडणूक लढवणार आहेत. त्यांनी प्रचाराला देखील सुरुवात केली आहे. त्यांनी आज मंदिरात जाऊन दर्शन घेतले. आज त्या उमेदवारी अर्ज देखील भरणार आहेत. गेल्या महिन्यात, सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणा-या याचिकेवरील निर्णय राखून ठेवला होता. ८ जून २०२१ रोजी उच्च न्यायालयाने सांगितले की, 'मोची' जात प्रमाणपत्र बनावट कागदपत्रांचा वापर करून फसवणूक करून मिळवले गेले. अमरावतीच्या खासदाराला २ लाखांचा दंडही ठोठावला होता.

# निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत प्रत्येक जबाबदार अधिकाऱ्याने जागरूकपणे कर्तव्य पालन करावे : जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत प्रत्येक जबाबदार अधिकाऱ्याने निवडणुकीची जबाबदारी जागरूकपणे आपल्या कर्तव्याचे पालन करावे, असे निर्देश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आज झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने ३९ बीड मतदार संघात होणाऱ्या निवडणूकी निमित्त आढावा बैठकीत दिले.

याबैठकीस जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, अपर जिल्हाअधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी सामान्य शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सर्व जिल्ह्याचे सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बोलत होत्या. आज झालेल्या आढावा बैठकीत मतदान अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण व्यवस्थापन, आदर्श आचारसंहिता, माहिती व्यवस्थापन, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट स्ट्रॉंग रूम रिसिविंग, निवडणूक साहित्य, टपाली मतपत्रिका व निवडणुकीच्या कामासाठी असणारे नोडल अधिकारी तसेच त्यांच्या अंतर्गत



काम करणारे कर्मचाऱ्यांचे मतदान, मतदार यादी, संगणक सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान, वाहतूक व संपर्क व्यवस्था, मतपत्रिका छपाई व वाटप, तक्रार निवारण व हेल्पलाइन, निवडणूक विषयक विविध परवाने, माध्यम प्रमाणे करण सनियंत्रण समिती तथा मीडिया कक्ष, निवडणूक निरीक्षक, मतमोजणी कक्ष, स्वीप चे कार्यक्रम, प्रथमोपचार सुविधा, निवडणूक कायदेविषयक कक्ष, मतदान केंद्रावरील सुविधा, अधिकारी कर्मचारी राजकीय उमेदवार यांना ओळखपत्र निर्गमित करण्याबाबत, दिव्यांग मतदार मदत व सण नियंत्रण, निवडणूक उमेदवाराचा खर्च यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी तसेच सर्व नोडल अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाशी संबंधित माहिती देण्यात आलेली असून भारतीय निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रत्येका विषयाशी संबंधित सविस्तर माहिती उपलब्ध आहे ही माहिती निवडणुकीसाठी कर्तव्य पार पडणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यांनी वारंवार वाचावी, प्रश्न असल्यास चर्चा करावी आणि त्याप्रमाणे आपल्या कर्तव्याचे पालन करावे. निवडणुकीच्या कुठल्याही कामात कसूर करून चालणार नाही. प्रत्येक काम निश्चित वेळेवर व्हावे यासाठी त्या पद्धतीचे सूक्ष्म नियोजन स्थानिक पातळीवर करण्यात यावे असे निर्देश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी दिले. आज सर्व सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या त्यांच्या विधानसभा मतदार संघात झालेल्या कामांची माहिती दिली. तसेच परळी सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर यांनी विधानसभा मतदारसंघात आवश्यक अधिकारी कर्मचारी आणि राजकीय पक्षांच्या सदस्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाचे सादरीकरण केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# पश्चिम महाराष्ट्र टँकरग्रस्त ; सर्वाधिक झळ पुणे व सातारा

**पुणे । प्रतिनिधी**

दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा टँकरग्रस्त झाला आहे. पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली आणि सोलापूर या चार जिल्ह्यांत मिळून ३३४ गावांतील तब्बल सहा लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वाधिक झळ सातारा आणि पुणे जिल्ह्यांना बसत आहे. उन्हाळ्यात सुरू झालेले टँकर अद्यापही सुरूच असून टँकरच्या संख्येत आगामी काळात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता विभागीय आयुक्तालयाकडून व्यक्त करण्यात आली आहे.




सर्वार्थाने सधन अशी ओळख असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात गेल्या वर्षी पावसाने ओढ दिली. उन्हाच्या झळांमुळे काही ठिकाणी पिके वाळत असल्याचे चित्र आहे. सिंचनाची सोय असलेल्या भागात अद्याप पिकांनी मान टाकलेली नाही. चारा उपलब्धतेवर देखील परिणाम झाला असून कोल्हापूरवगळता इतर चारही जिल्ह्यांत विहिरींनी तळ गाठला आहे. पाऊस कमी झालेल्या तालुक्यांत जनावरांच्या चाऱ्या-पाण्याची टंचाई जाणवत आहे. पुणे जिल्ह्यात आंबेगाव, बारामती, दौंड, हवेली, इंदापूर, जुन्नर आणि पुरंदर तालुक्यांत भीषण स्थिती आहे. साताऱ्यात माण, खटाव, कोरेगाव, खंडाळा, फलटण आणि काही प्रमाणात वाई, पाटण तालुक्यांतील गावांना फटका बसला आहे. सांगलीतील जत आणि आटपाडी, तर सोलापूर जिल्ह्यात सांगोला, मंगळवेढा, माढा, करमाळा, दक्षिण सोलापूर आणि माळशिरस तालुक्यांमध्ये भीषण परिस्थिती ओढवली आहे.

पुणे जिल्ह्यात २२ विहिरी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. साताऱ्यात ९३, सांगलीत ४१, तर सोलापूर जिल्ह्यात २४ विहिरी पाणीपुरवठ्यासाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत, असेही विभागीय आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

# दुष्काळातही तीन एकरांत ४५ टन कांदा उत्पादन..

**पुरंदर । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात या वर्षी भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकर्यांनाच कांदा विकत घेऊन खाण्याची वेळ आली आहे. मात्र, तालुक्याच्या पश्चिम भागातील एक-दोन गावांत थोडाफार पाऊस झाल्याने पाणीपातळी टिकून होती, त्यामुळे कोडीत व गराडे परिसरात काही शेतकर्यांनी ८०० ते ९०० पिशवी म्हणजे ४० ते ४५ टन कांदा उत्पादन मिळविले. मात्र, सध्या समाधानकारक बाजारभाव नसल्याने त्यांनी कांदा साठवणुकीवर भर दिला आहे. गराडे येथील प्रगतिशील शेतकरी मारुती घारे आणि मधुमती घारे या



दाम्पत्याने तीन एकर क्षेत्रावर कांद्याचे दर्जेदार उत्पादन घेतले.

त्यासाठी त्यांनी जास्तीत जास्त शेणखताचा वापर व कमीत कमी रासायनिक खतांचा वापर केला. जमिनीची चांगली मशागत करून शेणखत टाकून बेड तयार करून घेतले. पाण्याची कमतरता असल्याने पाणी देण्यासाठी ठिबक सिंचनाचा वापर करून पाण्याची बचत केली. साधारण १५ दिवसांच्या अंतराने कांद्याला पाणी सोडले. मार्च महिन्यात प्रत्यक्ष कांदा काढणीयोग्य झाला. मालाचा आकार आणि रंग अतिशय दर्जेदार होता. उत्पादनही ८०० ते ९०० पिशवी म्हणजे ४० ते ४५ टन मिळाले.निर्यातबंदीचा फटका या कांदा उत्पादकांना बसला. कांदा जर विकला तर उत्पादन खर्चदेखील निघणार नाही, अशी अवस्था होती. त्यामुळे घारे दाम्पत्याने सर्वच्या सर्व कांदा वखारीत साठवून ठेवला आहे. भविष्यात निर्यातबंदी उठवली जाईल आणि आपल्या हातात चार पैसे जास्त पडतील, या आशेवर या दाम्पत्याने कांद्याची साठवणूक केली. या सर्व कामात मारुती घारे यांचा मुलगा निखिल घारे हादेखील त्यांना मदत करत असतो.

# एक शपथ अशीही ! विवाह मंडपातच वधू-वराकडून मतदानाची शपथ

मंचर : : जवळे (ता. आंबेगाव) येथे अक्षय लोखंडे आणि उत्कर्षा घोडेकर यांच्या विवाहाची मिरवणूक निघाली. फेटे बांधलेले वराती लग्नासाठी सोबत होतेच. सनईच्या स्वरात सर्वांचे मंडपात दिलखुलास स्वागत करण्यात आले. लग्नघटिका समीप आली असताना वर-वधूंनी नवजीवनात प्रवेश करताना पहिले पाऊल मतदानाचा संकल्प करून टाकले. त्यांनी इतरांनाही मतदान करण्याचे आवाहन केले.

विवाहात ज्येष्ठांनी आशीर्वाद देतानाच थोरामोठ्यांचा मान ठेवण्याचा, सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचा संदेश दिला. त्याचे पालन करण्याचा निश्चय करतानाच देशाविषयीचे कर्तव्य म्हणून मतदान करणार असल्याचे सांगितले. नव्या संसाराची सुरुवात येत्या लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचा संकल्प करून नवविवाहित जोडप्याने करून एक




मोठा सामाजिक संदेश समाजाला दिला. जवळे गावात अक्षय लोखंडे आणि उत्कर्षा घोडेकर यांच्या विवाहाची तयारी सुरू असताना नवरदेवाची स्वारीही आली. अशात स्वीप पथकाच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या मतदान जनजागृती फेरीतील विद्यार्थ्यांनी वऱ्हाडी मंडळीला मतदानाचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत सर्वांनी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली.

शिरूर लोकसभा मतदारसंघांतर्गत आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील स्वीप पथक मतदारसंघात ठिकठिकाणी मतदान जनजागृती करीत आहे. जवळे गावात विवाहाच्या मिरवणुकीत मतदार जनजागृती करून वर-वधू आणि वऱ्हाडी मंडळींना मतदानाचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी सर्वांनी मतदान संकल्पपत्र भरू दिले. या उपक्रमात स्वीप सदस्य नारायण गोरे, सुनील भेके, सचिन तोडकर, तुषार शिंदे यांच्यासह विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# स्ट्राँग रूमच्या सुरक्षेची योग्य खबरदारी घ्यावी-जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे

## जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची मावळ लोकसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूमला भेट

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाअंतर्गत पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदार संघातील स्ट्राँग रुमला भेट देऊन स्ट्राँग रूमच्या सुरक्षेची योग्य खबरदारी घ्यावी, असे निर्देश दिले.

डॉ. दिवसे यांनी आज पिंपरी विधानसभा मतदार संघ कार्यालयांतर्गत ऑटो क्लस्टर, चिंचवड येथील मतदान साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र आणि निगडी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनातील स्ट्राँग रूम, थेरगाव येथील स्व. शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूम, साहित्य वाटप व स्वीकृती केंद्र, देहूरोड येथील मतदान केंद्र, सोमाटणे येथील जिल्हा परिषद शाळा मतदान केंद्र व नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्लॉलॉजी तळेगाव दाभाडे येथील स्ट्राँग रूमची पाहणी केली.त्यांनी स्टाँगरूम व्यवस्थापन, नियोजनाबाबत आढावा घेतला. मतदान यंत्रे ठेवण्यासाठीची



व्यवस्था, सीसीटिव्ही यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था यांची बारकाईने चाचणी करण्यात यावी, तसेच त्याठिकाणी २४७ आवश्यक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करावी. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी पिंपरीचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अर्चना यादव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपआयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका विठ्ठल जोशी आदी उपस्थित होते.जिल्हाधिकाऱ्यांनी पिंपरी येथे आयोजित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचीही पाहणी करुन क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी श्री. नवले यांनी मावळ विधानसभा मतदार संघातील पूर्वतयारी व नियोजनाबाबत माहिती दिली. मावळ मतदार संघामध्ये एकूण ३९० मतदान केंद्र आहेत. एकूण ४५ सेक्टर ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्रत्येकी ६ फिरती पथके (एफएसटी) व स्थीर निरीक्षण पथके (एसएसटी), ३ व्हीएसटी व २ व्हिडीओ पाहणी पथक (व्हीव्हीटी) व १ उमेदवार खर्च नोंदणी पथक अशी पथके कार्यान्वित करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

चिंचवड मतदार संघामध्ये एकूण ५४९ मतदान केंद्र आहेत. १०० टक्के एपिक रजिस्ट्रेशन झालेले आहे. एकूण ४८ सेक्टर ऑफिसर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच ६ एफएसटी, ६ एसएसटी, २ व्हीएसटी व १ व्हीव्हीटी व एक अकाउंटिंग टीम अशा टीम कार्यान्वित करण्यात आलेली असल्याचे श्री. जोशी यांनी सांगितले.पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये ८५ इमारतीमध्ये एकूण ३९९ मतदान केंद्र असून सर्व मतदान केंद्र ही तळमजल्यावर आहेत, अशी माहिती अर्चना यादव यांनी दिली.

# पुणे बाजार समितीकडून आंबा आवकमध्ये गोलमाल

## वरिष्ठांना डावलून कनिष्ठ अधिकाऱ्याची विभागप्रमुख पदी वर्णी

पुणे : पुणे बाजार समितीमध्ये आंबा हंगाम सुरु झाला आहे. परंतु, आंबा आवकमध्ये सध्या गोलमाल सुरु झाला असून व्यापारी आणि समितीच्या आवकमध्ये मोठी तफावत असल्याचे समोर येत आहे. संचालक मंडळाकडून मर्जीतल्या आडत्यांची आंबा आवकमध्ये मोठ्या प्रमाणात लपवाछपवी सुरू झाल्याची चर्चा बाजारात आहे. तर आवक आणि सेस मध्ये लपवाछपवी करण्यासाठी वरिष्ठांना डावलून कनिष्ठ अधिकाऱ्यांची विभाग प्रमुख पदावर नियुक्ती केल्याची देखील चर्चा सध्या बाजारात सुरु आहे. त्यामुळे यंदाचा आंब्याचा हंगाम चांगलाच गाजण्याची शक्यता आहे.

पुणे बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्ड मधील फळ बाजारात सध्या आंब्याची आवक सुरु झाली आहे. कोकणातून हापुस आणि कर्नाटकासह इतर राज्यातून आंब्याची आवक होत



आहे. सध्या मार्केट यार्डमध्ये दररोज ८ ते १० हजार पेट्यांची आवक होत असून पाडव्यापासून यामध्ये मोठी वाढ होणार आहे. बाजार समितीच्या वतीने सांगण्यात येणारी बाजारीतील प्रत्यक्ष आवक आणि व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येणारी आवक यामध्ये मोठी तफावत आढळून येत आहे.

बाजार समितीमध्ये शेतमाल आवक लपवा छपवीचा प्रकार नवीन नाही. प्रत्येकवर्षी असा प्रकार सुरु असतो. परंतु, आता संचालक मंडळाकडून मर्जीतल्या आडत्यांची आंबा आवकमध्ये मोठ्या प्रमाणात लपवा छपवी सुरु झाल्याची चर्चा मार्केट यार्डमध्ये सुरु आहे. यासाठी मर्जीतील कर्मचाऱ्यांना विभाग प्रमुख पदावर नियुक्ती करुन घेतली आहे.

गट प्रमुखांचा पार्कीगमध्ये अड्डा

फळे व भाजीपाला विभागात १५ फुटांपेक्षा जास्त जागेचा वापर करुन रस्त्यावर व्यवसाय सुरु आहे. काही व्यापारी रस्त्यावर गाड्या लावून व्यापार करत आहेत. काही व्यापारी १० ते १२ मनमानीच्या गाळ्यावर दुबार विक्री करत आहेत. परंतु, याकडे कानाडोळा करुन पाच ते दहा हजारांची कारवाई करुन अनेकांना मुभा दिली जाते. फळ बाजार विभागात गट प्रमुख, कर्मचाऱ्यांनी गेटवर सिक्युरीटीच्या केबिन, पार्किंमध्ये अड्डा बनवला आहे.

### आंब्याची आवक पारदर्शीपणे नोंदवणार

यासंदर्भात बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी सांगितले की, बाजारात दाखल होणाऱ्या सर्व आंब्यांची आवक नोंद होण्यासाठी बाजार पर्यवेक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. याशिवाय त्यांच्या सोबत इतर दोन कर्माचारी असे तीन अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. फळे व भाजीपाला विभाग प्रमुख यांच्यावर ही नेमणूक असेल. आंब्याची आवक पारदर्शीपणे नोंदवण्यात येईल.

# वाहन चोरी करणाऱ्या इसमाला देहूरोड पोलिसांनी अटक करत ३ गुन्हे उघडकीस आणले

पुणे । प्रतिनिधी

वाहन चोरी करणाऱ्या एका चोरट्याला देहूरोड पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून चार दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहे. रवींद्र सुरेश सातोळे (वय १९, रा. गांधीनगर, देहूरोड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

२९ मार्च रोजी देहूरोड मधील स्वामी चौक येथील ब्रिज खालून एक दुचाकी चोरीला गेली. याप्रकरणी दुचाकी मालक चंद्रकांत तलारी यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. यातील आरोपीचा शोध घेत असताना देहूरोड पोलिस तपस पथकातील पोलीस अंमलदार मोहसीन अत्तर व शुभम बावनकर यांना त्यांच्या गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली कि एक इसम चोरीची मोटारसायकल घेऊन देहूरोड येथील शिवाजी विद्यालयाजवळ येणार आहे.

त्यानुसार पोलिसांनी सापळा लाऊन रवींद्र सुरेश सातोळे (वय १९, रा.पाण्याच्या टाकी जवळ, गांधीनगर, देहूरोड) याला ताब्यात घेतले त्याच्याकडून चोरीला गेलेली मोटारसायकल व त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याची चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली, त्याच्याकडे सखोल व कसून तपस केला असता त्याने देहूरोड पो. स्टे. गुरनं. १६६/२०२४ भा.दं.वी. कलम




३७९, देहूरोड पो. स्टे. गुरनं. १७६/२०२४ भा.दं.वी. कलम ३७९ व पिंपरी पो. स्टे. गुरनं. १३७/२०२४ भा.दं.वी. कलम ३७९ प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्याच्याकडून नमूद गुन्ह्यातील तीन मोटरसायकल हस्तगत करण्यात आले आहे.आरोपी रवींद्र सातोळे त्याच्याकडून एकूण १ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या एकूण चार मोटर सायकल हस्तगत करण्यात आले आहेत त्याचप्रमाणे देहूरोड पोलीस स्टेशनचे तीन व वाकड पोलीस स्टेशनचा एक असे एकूण चार गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश प्राप्त झाला आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ - २ बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त देहूरोड विभाग घेवारे यांच्या आदेशोस्तव वरिष्ठ पोलीस निरीक्षक देहूरोड विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक अजय कुमार राठोड, पोलीस आमदार प्रशांत पवार, बाळासाहेब विधाते, संतोष जाधव, सुनील यादव, किशोर परदेशी, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडिक, निलेश जाधव, मोहसीन अत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्निल साबळे, सागर पंडित यांनी केली आहे. देहूरोड पोलीस तपास करीत आहेत.

# सेक्टर अधिकाऱ्यांना मतदान कसे करावे याचे प्रशिक्षण

**पिंपरी । प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्वाधिक मतदार असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सेक्टर अधिकार्यांना मतदान केंद्राची तयारी, मतदान प्रक्रिया, मतदान पूर्ण झाल्यानंतरचे कामकाज आदी संदर्भातील प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण थेरगाव येथील स्व. शंकरअण्णा गावडे कामगार भवन येथे झाले.



या वेळी मावळ लोकसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, चिंचवड मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणासाठी ४८ सेक्टर अधिकारी, ४८ सहायक आणि ५ राखीव सेक्टर अधिकारी उपस्थित होते. यातील ५ सेक्टर अधिकार्यांना जिल्हास्तरावर मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिवाय मतदान यंत्राच्या हाताळणीचे देखील प्रशिक्षण त्यांनी घेतले आहे.

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी मतदान प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली. सेक्टर अधिकार्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरंसन केले. मतदान केंद्रावरील संपूर्ण तयारी, मतदानापूर्वीची तयारी, मतदानावेळीची तयारी आणि मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरची तयारी याबाबतची सविस्तर माहिती त्यांनी दिली. मतदान साहित्य ताब्यात घेणे आणि जमा करणे, याबाबतची देखील माहिती देण्यात आली.

मतदान केंद्राची स्थिती आणि त्या ठिकाणी करावयाच्या उपाययोजनांची तपशीलवार माहिती तहसीलदार अमोल कदम यांनी दिली. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रशिक्षण कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड आणि उपअभियंता प्रकाश कातोरे यांनी दिले. मतदान यंत्र सीलिंग आणि कमिशनिंगबाबत माहिती देण्यात आली. प्रशिक्षणार्थींकडून मतदान यंत्र हाताळणीचे प्रत्यक्ष प्रात्याक्षिक करून घेण्यात आले. प्रशिक्षणासाठी ४० मतदान यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली होती. सेक्टर अधिकार्यांचे समन्वय अधिकारी अजिंक्य येळे यांनीही मार्गदर्शन केले.

# भीषण पाणीटंचाई ! वरोती येथे रेशनिंगप्रमाणे पाण्याचे वाटप

वेल्हे : जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस पडणार्या व अतिवृष्टी होणार्या तोरणागड परिसरातील दुर्गम वरोती, कुसारपेठ (ता. राजगड) व परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये भीषण पाणीटंचाई सुरू आहे. वरोती येथे नदीतीरावरील विहिरीचे पाणी स्थानिक नागरिकांना रेशनिंग पध्दतीने वाटप केले जात आहे. या भागातील लाखो रुपये खर्चाच्या जलजीवनच्या पाणी योजना अर्धवट अवस्थेत खितपत पडल्या आहेत. बंधारे, पाणवठे कोरडे ठणठणीत पडले आहेत. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून हंडाभर पाण्यासाठी महिला, मुले नागरिकांची कडक उन्हात वणवण सुरू आहे.

वरोती येथील नदीवर जलसंधारण योजनेंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून पाझर तलाव उभारला जात आहे. मात्र, हे काम संथ गतीने सुरू आहे. यापूर्वी या भागात कोट्यवधी रुपये खर्च करून बंधारे, पाणी योजना राबविण्यात आल्या. मात्र, निकृष्ट कामामुळे त्या फसल्या आहेत. डोंगर माथ्यावरील कुसारपेठ धनगरवस्तीत देखील पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. येथील जलजीवन योजनेचे काम अर्धवट अवस्थेत आहे. योजनेचे पाइप टाकले असून, विहीर बांधली आहे. एक किलोमीटर अंतरावरील या विहिरीतील पाणी भर उन्हात डोक्यावरून आणून कुसारपेठचे रहिवासी आपली तहान भागवत आहेत.

वरोतीचा बंधारा जमीनदोस्त होण्याच्या स्थितीत वरोती येथील एक बंधारा जमीनदोस्त होण्याच्या स्थितीत, तर दुसरा कोरडा आहे. ५०० लोकवस्तीच्या वरोतीसाठी प्रथम राष्ट्रीय पेयजल योजना आणि नंतर जलजीवन योजनेचे काम सुरू झाले. लाखो रुपये खर्च करून या योजनेसाठी नदीतीरावर नवीन विहीर बांधली. मात्र, अद्यापही योजना सुरू झालेली नाही. या योजनेच्या विहिरीतील पाण्याची पातळी खाली गेल्याने ग्रामस्थांना रेशनिंगप्रमाणे पाण्याचे वाटप केले जात आहे.

# आरएमसी वाहनाची तलाठ्याच्या कारला धडक

## आरएमसी वाहनचालकाच्या बेशिस्थपणामुळे घडला अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

आरएमसी वाहनाने मावळ तालुक्यातील एका तलाठ्याच्या कारला धडक दिली. सुदैवाने या घटनेत तलाठी सुखरूप आहेत. ही घटना बुधवारी (दि. ३) देहूरोड जवळ पुणे मुंबई जुन्या महामार्गावर घडली. याबाबत माहिती अशी की, कान्हे गावचे तलाठी रवी मेहरुत हे जुन्या पुणे मुंबई महामार्गावरून कारणे जात होते देहूरोड येथील सेंट्रल चौकाच्या पुढे तळेगावच्या दिशेने जात असताना त्यांच्या कारला पाठीमागून आरएमसी वाहतूक करणाऱ्या वाहनाने धडक दिली. यामध्ये मेहरुत यांच्या कारचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने कार मधील सर्व एअर बॅग उघडल्याने ते बचावले.

या अपघातामुळे जुन्या पुणे मुंबई महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत केली.

असाच एक अपघात बुधवारी (दि. ३) रावेत पोलीस स्टेशनच्या हद्दीत आकुर्डी रेल्वे स्टेशन व डि.वाय. पाटील कोलाज आकुर्डी या दरम्यान असलेल्या चकात घडला. या अपघात मध्ये कर चालक कार उजव्याबाजूला वाळवत असताना आरएमसी वाहनाने एका बाजूने पूर्ण कार घासून, आपल्याकडून अपघात झाला आहे याची जाणीव असून देखील तेथून तो निघून गेला. कारचालकाने त्याचा पाठलाग केला. त्या रोडवर गतिरोधक असल्या मुले आरएमसी वाहन चालकाला वेग कमी करावा लागला व कारचालकाने त्याला थांबवून पोलिसांना फोनवरून कळविले असता पोलिसांनी दोन्ही गाड्या व चालकांना रावेत पोलिस स्टेशनला नेले. कारचालक महिला होती, व तिच्या सोबत तिची आई व ५ वर्षाची मुलगी होती. सुदायवाने या अपघातात कोणत्याही प्रकारे जीवित हानी झाली नसून कारचा मोठा नुकसान झाला. आरएमसी वाहन मालक त्या ठिकाणी आलेल्या नंतर त्याने कारचा नुकसान भरपाई देण्यास मंजुरी दिल्यामुळे त्याचचं आपसात समजुत झाली व गुन्हा दाखल झाला नाही.मात्र या दोन्ही अपघातात चूक पूर्णपाने आरएमसी वाहन चालकांचीच असल्याने हे अपघात घडले आहे. असे कितीएक अपघात घडून अनेक निष्पाप मातृमुखी पडत असतात मात्र अपघातंची नोंद खूप कमी होती. अशे अपघात टाळण्यासाठी ट्रफिक, आर.टी.ओ. व संभंदीत प्रशासनाने उपाय योजना करणे बांधकारक आहे, तसेच ते लवकरात लवकर कारवायात अशी मागणी सर्व स्तरावरून केली जात आहे.

cmyk